गुरूवार, २५ एप्रिल २०२४
किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - २३९
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 25 APRIL 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-239 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05


## लबाडाच्या घरचे अवताण जेवल्याशिवाय खरे नाही

### शरद पवारांचा मोदींवर हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**माढा :** सामान्य माणसाची महागाईतून सुटका केली नाही. १० वर्षांत स्वतः काही केले नाही आणि हिशेब आम्हाला मागतात. मोदींनी गेल्या दहा वर्षात एकही आश्वासन पूर्ण केले नाही, लबाडाच्या घरचे अवताण जेवल्याशिवाय खरे नाही, असे म्हणत शरद पवार यांनी मोदींवर हल्लाबोल केला आहे. माढा लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या प्रचारसभेत ते बोलत होते. पवार पुढे म्हणाले की, पंतप्रधान मोदी यांनी देशात स्वातंत्र्यपूर्वीचा काळ आणला आहे. आदिवासींची स्थिती खालावली आहे. मोदींनी फक्त महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरुंवर टीका केली. जे लोक हयात नाहीत, त्यांच्यावर ते टीका करतात. त्यांनी दहा वर्षात काय केले यावर ते काहीच बोलत नाहीत, असे शरद पवार म्हणाले.









# भोयेगावजवळ सापडली अश्मयुगीन अवजारे

## 25 हजार वर्षांपूर्वीच्या आदिमानवांच्या वस्तीचे पुरावे

आधुनिक केसरी न्यूज

प्रा. श्याम हेडाऊ

चंद्रपूर : कोरपणा तालुक्यातील वर्धा नदीच्या किनारी असलेल्या भोयेगाव जवळ शेती आणि जंगल परिसरात 25 हजार वर्षांपूर्वीच्या मध्यपाषाण युगातील आदिमानवांची अवजारे येथील भूशास्त्र आणि पर्यावरण अभ्यासक प्रा. सुरेश चोपणे यांनी नुकतीच शोधली आहेत. चंदपूर जिल्ह्यात अनेक ठिकाणी अशी अवजारे मिळाली असली तरी ह्या परिसरात प्रथमच अश्या प्रकारची मध्याश्मयुगीन अवजारे मिळाली आहेत, अशी माहिती त्यांनी नुकतेच प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.


भोयेगाव येथे आढळलेली ही अवजारे आर्कीयन काळातील रुपांतरीत खडकापासून बनविलेली असून त्यात अर्ध मौल्यवान समजल्या जाणाऱ्या जास्पर, अगेट, क्वाट्र्झ ह्या खडकांचा समावेश आहे. विदर्भ आणि विशेषता चंद्रपूर जिल्हा हा पाषांनयुगात विशेषता हिमयुगात जास्त लोकसंख्या असलेला प्रदेश होता हे अनेक ठिकाणी आढळलेल्या अवजारावरून लक्षात येते. अश्मयुगात मानव नदीकिनारी राहत असे. भोयेगाव परिसरात नदीकिनारी आढळणारे खडक हे १५० कोटी वर्षाच्या आर्कीयन काळातील असून ते रुपान्तरीत प्रकारात मोडतात. हे खडक ह्या परिसरात हिमयुगात वाहून आलेले, गाल मिश्रित अल्लूवियम, असून त्यात लहान गोल खडक आढळतात. हे खडक ४०००० ते २५००० वर्षादरम्यान वाहात आलेले आहेत ह्यात क्वार्टझाईट, अगेट, क्वाट्र्झ, जास्पर हे खडक अतिशय टणक आणि मजबूत असून अश्म अवजारांसाठी अत्यंत उपयुक्त आहेत. म्हणूनच अश्मयुगातील लोकांना क्वार्टझाईट मँन असे म्हटल्या गेले. भोयेगाव जवळील अवजारात पूर्व पाषाण युगात वापरात असलेली खूप मोठ्या आकाराचचे अवजारे नाहीत तर लहान आकाराची हात कुर्हाड आणि ब्लेड्स जास्त प्रमाणात आढळतात. यापूर्वी प्रा. सुरेश चोपणे ह्यांनी चंद्रपूर तालुक्यातील वर्धा नदीकिनारी हडस्ती येथे २००७ मध्ये, चंद्रपूर जवळ झरपट नदीकिनारी (पापामिया) येथे १९९७ मध्ये तसेच इरई नदीजवळ दाताळा येथे 2011 मध्ये, पोभुर्णाजवळ वैनगंगा नदीकिनारी २००८ मध्ये अशी १५ ठिकाणी त्यांनी अश्मयुगीन अवजारे शोधली आहेत. २ लाख ते ५ हजार वर्षे कालखंडात अश्म युगाचे पुराश्म युग,मध्याश्म युग आणि नवाश्म युग असे प्रामुख्याने ३ भाग पाडण्यात आले असून चंद्रपूर जिल्ह्यात तीनही कालखंडात मानव वास्तव्यास होता.

प्राचीन मानव हा भटकंती करीत असला तरी तो हा बारमाही नदी किंवा नाल्याच्या जवळ काही काळ राहत असे. ह्या परिसरात गुहा नसल्याने ते झाडाच्या आसऱ्याने उघड्यावर जीवन जगात असे. अवजारे बनविणे आणि अन्नाच्या शोधात भटकणे असा त्यांचा दिनक्रम असे. ज्या ठिकाणी अवजारे बनविण्यासाठी योग्य खडक असेल आणि अन्न उपलब्द असेल तेथे काही वर्षे राहणे आणि पुढे योग्य ठिकाणी जाणे असे त्यांचे जीवन होते. खर तर बहुजन समाज वंशज- आज जिल्ह्यात जो आदिवासी आणि बहुजन समाज आहे ते अश्मयुगीन मानावांचेच वंशज आहेत.



आदिमानवामध्ये सुधा वांशिक विभिन्नता होती हे त्यांच्या आजच्या चेहरेपटीवरून लक्षात येते. पुढे वांशिक सरमिसळ झाली आणि मानव विविध जातीत विभागलेला आजचा बहुजन समाज निर्माण झाला. पुढे नवाश्म युगात आपण शेती करायला शिकलो आणि गावे करून स्थाईक झालो.

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


## बाग फुलवणारा एक योगी अवलिया




आधुनिक केसरी

त्यामुळे त्या घराला वेगळीच शोभा आलेली होती. मला ती बाग फार आवडायची. एके दिवशी त्या बागेत एक व्यक्ती मला झाडांची कापणी करताना दिसली. मी तिथे जाऊन चौकशी केली तेव्हा तो बागकाम करणारा माळी होता आणि तो साधारणपणे पंधरा दिवसांनी त्यांच्याकडे यायचा हे कळले. मग मी त्या व्यक्तीला माझ्याकडे सुद्धा येण्यास सांगितले. ठरल्याप्रमाणे ठरल्या दिवशी ती व्यक्ती माझ्याकडे हजर झाली आणि त्या अवलियाचा आणि माझा परिचय झाला. सुरुवातीला मला त्याच्या काही अटी ऐकून घ्याव्या लागल्या. मी अमुक दिवशी अमुक वेळेला येईन. एक तास काम करीन. अमुक इतकेच पैसे घेईन वगैरे वगैरे. असे काम करणारी दुसरी व्यक्ती तोपर्यंत माझ्या दृष्टीपथात नसल्याने मी त्याच्या सगळ्या अटी मान्य केल्या. हा गृहस्थ बरोबर ठरल्या वेळी यायचा. एका तासात त्याचे सगळे काम करून निघून जायचा. सुरुवातील मला वाटलं की हा फार थोडे काम करतो आणि निघून जातो. पण नंतर माझ्या लक्षात यायला लागले की त्याचा काम करण्याचा वेग जास्त होता. कधी कधी तो स्वतःबरोबर त्याच्या मुलाला किंवा दुसऱ्याही इतर एखाद्या मुलाला घेऊन येई.ती मुलं शाळा शिकता शिकता बागकामही करीत. त्याच्याबरोबर काम करता करता त्या मुलांची बागकामाची दृष्टी विकसित झाली. पुढे ते दुसरीकडेही स्वत्रंतरीत्या काम करू लागले. या मुलांची त्याला त्याच्या कामात मदत तर व्हायचीच पण त्यांना जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारे बागकामाचे कौशल्य त्याने शिकवले. त्यांना त्यांच्या पायावर उभं राहायला मदत केली.

## हितगुज



पुष्प ४८वे



**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**

### श्रेष्ठ भक्तीभाव

एकरूप होऊन भान हरपून संत कुंभनदास श्रीकृष्णलीला गाऊ लागले की कोमल ब्रजवाणी अधिक मधुर व्हायची. समर्पण भक्ती या माधुर्याला दिव्यनाद प्राप्त करून द्यायची. त्यामुळे संत कुंभनदास भजने म्हणत त्यावेळी सर्व सृष्टी, माणसे डोलू लागत. सर्वांच्या मनात श्रीकृष्णाचे गोकुळ साकारत असे. रहीमकडून व जनतेकडून संत कुंभनदासाची सुकीर्ती ऐकून त्याला सन्मानित करण्यासाठी भरपूर नजराणा देऊन अकबराने कुंभनदासांकडे निमंत्रण द्यायला दूत पाठवले. कुंभनदासांच्या झोपडीपुढे घोडेस्वार अदबीने उभे राहिले. त्यांनी नजराण्याची ताटे समोर ठेवली. मोहरा व रत्नांचा लखलखाट झाला. जरीच्या वस्त्रांनी त्याला आणखी चमक आणली. परंतु संत कुंभनदासांचा चेहरा निर्विकार होता सोन्याच्या मोहरा व हिरेमाणकांनी त्यांच्या डोळ्यात चमक आणली नाही. दूताने सांगावा सांगितला, कुंभनदासांनी नकार देऊन नजराणा परत करून फक्त एवढेच म्हटले की 'संतन को कहाँ सीकरी सो काम' संताला सीकारीच्या बादशहाच्या वैभवाची काय गरज आहे? त्याला बादशहाच्या मर्जीची, मेहरबानीची काय आवश्यकता आहे? या ब्रह्माडांचा अधिनायक, स्वामी असलेल्या ईश्वराचा तो सेवक आहे, तेव्हा त्याला इतरांची सिफारिश कशासाठी हवी? भक्तीच्या सुखापुढे सर्व संपत्ती व्यर्थ आहे. संतांनी ईश्वर प्रेमाच्या सुखापुढे सर्व वैभव व भौतिक सुखे नाकारली. मीरेने राणीपद व राजवैभव एका क्षणात त्यागले. छत्रपती शिवाजी राजांचे गुरू संत रामदास हे शिवाजी राजांच्या महाली न राहता शिवथरच्या घळीत रमले. श्री स्वामी महाराजांकडून अक्कलकोटचे राजे वैभवासहित जेव्हा प्रथम भेटीला आले तेव्हा महाराजांनी त्यांना कठोर शब्दाने 'मैं बुधबल के राजा क्षण में हजारों बनाता और मिटाता हूँ' अशी जरब देऊन संपत्ती प्रदर्शनापेक्षा मनातला भक्तीभाव श्रेष्ठ आहे, याची जाणीव करून दिली व याच कारणाने त्यांनी बडोद्याच्या मल्हाररावांना कधीही दर्शन दिले नाही.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

## आनंदी पहाट



## पाल्यांना स्वातंत्र्य नव्हे, तर स्वायत्तता द्यावी

आधुनिक केसरी

सदोष पालकत्व तेव्हा घडते, जेव्हा पालक त्यांच्या मुलांच्या सर्वोत्तम हितापेक्षा त्यांच्या स्वतःच्या आवडींना प्राधान्य देतात. काही पालक असे निर्णय घेतात, कि जे त्यांच्या मुलांच्या हिताचे नसतात. याचा अर्थ असा नाही की, चांगले पालक होण्यासाठी तुम्ही तुमच्या मुलाच्या गरजा नेहमी तुमच्यापेक्षा जास्त पालक म्हणून, तुम्ही तुमच्या मुलाच्या मूलभूत मूल्यांवर, जसे की धार्मिक मूल्ये आणि त्यांच्या भविष्याशी संबंधित समस्या, जसे की शैक्षणिक निवडींवर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करत असता. तुमचे तुमच्या मुलाशी असलेले नाते जितके मजबूत असेल तितका तुमचा प्रभाव जास्त असेल, कारण तुमचे मूल तुमचे मार्गदर्शन घेईल आणि तुमच्या मताची आणि समर्थनाची कदर करेल. मुलांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी पालकत्वाचे प्रमुख चार प्रकार दिसून येतात. आज बाल मानसशास्त्रात वापरल्या जाणाऱ्या चार मुख्य पालक शैली म्हणजे परवानगी देणाऱ्या, अधिकृत, दुर्लक्षित आणि हुकूमशाही ह्या होत.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

चांगल्या पालकत्वामध्ये मोठ्या प्रमाणात सातत्य आणि दिनचर्या यांचा समावेश होतो, ज्यामुळे मुलांना नियंत्रणाची भावना मिळते; म्हणजे अपेक्षा, शिस्त आणि लवचिकता निर्माण करण्याच्या रणनीती आणि मुलांचे विकासाचे वय यांच्याबाबतीत अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो. व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी मुलांचे सामाजिकीकरण करणे हे चांगले पालकत्वाचे उद्दिष्ट आहे. ठेवाव्यात. लहान मुलांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी पालकत्वामध्ये तीन आवश्यक घटक असतात. प्रथम, काळजी मुलांना हानीपासून वाचवते. काळजीमध्ये भावनिक तसेच शारीरिक आरोग्याचाही समावेश होतो. दुसरे म्हणजे, नियंत्रणामध्ये मुलांची आणि इतरांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी सीमा निश्चित करणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे क्रियाकलापांच्या सतत विस्तारित क्षेत्रांमध्ये समाविष्ट असते.



आधुनिक केसरी

## तुचि आता हरि | तारणहार ||

पाहुनी प्रसंग | व्हावे सावधान ||
ठेऊनिया भान | सिध्द व्हावे ||१||
क्षणोक्षणी येथे | दगाबाज थोर ||
चोरांचा बाजार | मातलेला ||२||
सज्जनांचा वाली | कोणी न उरला ||
दांभिक ठरला | श्रेष्ठ आज ||३||
सहावेना आता | मुढांची मुजोरी ||
तुझ्या दरबारी | न्याय कैसा ||४||
थकूनी भागूनी | आलो तुझ्या दारी ||
तुचि आता हरि | तारणार ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

अमृत सागर उमड़ता, सूझे वार न पार ।
मुक्त हँस मोती चुगे, दशो दिशा रस सार
।।०९।।(स्वर्वेद पंचम मण्डल सप्तदश अध्याय) ०५/१७/०९

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
तो ( परमेश्वर) उसळता अमृत सागर आहे ज्याचा थांग लागत नाही आणि दशदिशा आनंदाने परिपूर्ण आहेत, जिथे मुक्त हंस शब्दानंदाचे (अमृत आनंदाचे) मोती टिपतात.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## गुणरूपनिरूपण

आधुनिक केसरी

पंचमहाभूता पैकी आकाश हे वेगळेपण दाखवणारे आहे आणि ते वेगळे कसे आहे हे आपण आत्तापर्यंत अभ्यासले आहे आत्ता आपण समासाच्या पुढच्या भागाकडे वळूया. आकाश हे शून्यमय आहे. ते अवकाश रूप असल्याने त्याला शून्यत्व येते. आता आपण या ठिकाणी म्हणू शकतो ते परब्रह्म आहे त्यामुळे त्यांचें निराळे पण अनुभवास येत नाही. पण तर्कावर बोट ठेवून पूढे जाताना त्यांचे वर्णन करताना ते दृष्यासारखे नाही असे सांगावे लागते. पण ते शुन्य नाही.कारण आकाशाचे ज्ञातपण कधीच संपणारे नाही. दृष्य पणाची कोणतीही उपाधी नसणारे जे आकाश आहे ते ब्रम्हस्वरूप आहे हे मात्र आपण १०० टक्के मान्य करतो.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## नामाचा अनुभव

आधुनिक केसरी

नामाचा अनुभव कोणता ? नामाचा अनुभव नामाव्यतिरिक्त दुसऱ्या कशात पाहू नये; म्हणजे, नामापासून दुसरे काही मिळवायचे आहे ही कल्पनाच नसावी. नाम मुखी येते हाच नामाचा अनुभव. ज्या प्रमाणात आपल्या हातून नामस्मरण घडले त्या प्रमाणात आपल्याला नामाचा अनुभव आला असे समजावे. अखंड नामस्मरण टिकले, की पुरा अनुभव आला. नामस्मरण करता करता चित्त एकाग्र होते. देहबुद्धी विसरून नाम घेणे हेच निर्गुण होणे आहे. मी कोण आहे हे कसे ओळखावे ? ' मी कोण आहे ' हे ओळखायला, जडाने म्हणजे वाचेनेच नाम घेण्यास सुरुवात करावी, आणि ते नाम अखंड घेण्याचा प्रयत्न करावा. मग ते मनाने आतल्याआत होऊ लागते. पहिल्यानेच आपल्या प्रयत्नाने मनाला नामाचे वळण लावण्याच्या नादी लागू नये, कारण ते फारच अवघड आहे. नाम घेता घेता देहाचा विसर पडल्यावर मी कोण आणि देव कोण हे आपोआप कळेल. भगवंताच्या नामाचा नाद लागला तर दुःखाची जाणीव कमी होते.



दुःखाची जाणीव नसल्यावर दुःख असले म्हणून बिघडले कुठे ? काळोख्या रात्री जशी काठी आधार असते, तसे संसारात नाम आहे. खाचखळगे काठीच्या योगाने टाळता येतात, तसे मोह, लोभ इत्यादि संसारातल्या अडचणी नामाने समजतात आणि दूर करता येतात. विस्तवाजवळ तूप ठेवले की ते वितळते, तसे नामाची शेगडी ठेवली की अभिमान वितळलाच पाहिजे. हाच नामाचा अनुभव. पण लोक नामाबद्दल ऐकूनच घेत नाहीत; जर कोणी ऐकून घेतले तर ते बिंबवून घेत नाहीत, त्याचे मनन करीत नाहीत; आणि मनन करून ज्यांना ते पटले, ते पटले असूनही नाम घेत नाहीत. अडचणी असल्या तरी नाम घेता येते. म्हणून नामस्मरण न करण्याबद्दल सबबी सांगू नका. सबब सांगितली की त्यापासून लबाडी उत्पन्न होते, लबाडीतून आळस उत्पन्न होतो, आणि आळसाने सर्वनाश होतो. आपण रोज उठल्यावर भगवंताचे स्मरण करण्याचा नियम ठेवावा. स्नान वगैरे गोष्टी झाल्या तर कराव्याच, पण त्यांच्यावाचून अडून बसू नये. भगवंताचे स्मरण हे मुख्य आहे. अखंड नामस्मरण ठेवायला सोवळ्याओवळ्याचे बंधन नाही. अखंड स्मरणच सोवळे आहे. उपासना कोणतीही असली तरी नामाशिवाय ती पचनी पडत नाही. महत्त्व नामाला आहे. निरनिराळ्या देशांतले अन्न निरनिराळे असू शकते, पण ते पचविण्याकरिता लागणारे पाणी इथून तिथून सर्व सारखेच. पाण्याशिवाय कोणतेही अन्न पचणार नाही. त्याप्रमाणे उपासनारूपी अन्नाला पचविण्यासाठी नामरूपी पाण्याची जरुरी आहे. म्हणून नामाला महत्त्व देऊन ते सतत घेण्याचा अभ्यास करावा. कसाही प्रसंग आला तरी नामस्मरण सोडू नका. त्यातून परमात्मा हात देईल.

२१. नाम घ्यायला स्वतःचीच आडकाठी असते. ती दूर केली तर नामाचा अनुभव आल्यावाचून राहणार नाही.

## निरूपण

आधुनिक केसरी

दरवडे घालूनियां जना । तश्कर करिती यातना ।
तेणें दुःख होये मना । या नांव आदिभूतिक ॥ ३८ ॥
अग्नीचेनि ज्वाळें पोळे । तेणें दुःखें प्राणी हरंबळे ।
हानी जालियां विवळे । या नांव आदिभूतिक ॥ ३९ ॥
नाना मंदिरें सुंदरें । नाना रत्नांचीं भांडारें ।
दिव्यांबरें मनोहरें । दग्ध होती ॥ ४० ॥

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरूवार, २५ एप्रिल २०२४

adhunikkesari.com

# पंकजाताई मुंडेंची बीड शहरात अभूतपूर्व महारॅली

## विजयाच्या जयघोषाने शहर दणाणले; सर्वत्र जल्लोष, फुलांचा वर्षाव अन् मतदारांचा उत्साह

आधुनिक केसरी न्यूज



**बीड :** फटाक्यांची आतिषबाजी, ढोल ताशांचा निनाद, फुलांचा वर्षाव, जोश, जल्लोष आणि त्याच्या जोडीला मतदारांचा सळसळता उत्साह अशा जबरदस्त वातावरणात भाजप, महायुतीच्या लोकप्रिय उमेदवार पंकजाताई मुंडे यांची आज शहरात अभूतपूर्व अशी महारॅली निघाली. रॅलीपूर्वी दुपारी 2.15 वा. पंकजाताई मुंडे यांनी महायुतीच्या प्रमुख नेत्यांसह जिल्हा निवडणूक निर्णय अधिका-यांकडे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे,खा. डॉ.प्रीतमताई मुंडे, गौरव खाडे, यशःश्री मुंडे, पंकजाताईंचे चिरंजीव आर्यमान पालवे, मनसे नेते व मामा प्रकाश महाजन, आ.प्रकाश सोळंके, आ. सुरेश धस, आ.बाळासाहेब आजबे,आ. नमिता मुंदडा, माजी आ.अमरसिंह पंडित, भीमराव धोंडे, आर.टी. देशमुख, केशवराव आंधळे, संजय दौंड, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, कुंडलिक खांडे, सचिन मुळूक, भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, कल्याण आखाडे, पी. टी. चव्हाण, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, रमेश आडसकर, मोहन जगताप, वाल्मिक निकाळजे, सलीम जहांगीर, अण्णासाहेब मातकर, राजेंद्र मोटे, सुमंत धस, अनिल तुरूकमारे आदींसह महायुतीचे नेते यावेळी उपस्थित होते.

अर्ज दाखल केल्यानंतर पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ शहरात महायुतीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या वतीने अभूतपूर्व अशी महारॅली काढण्यात आली. शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करत पंकजाताई मुंडेंनी या रॅलीत उपस्थितांचे स्वागत सत्कार आणि आशीर्वाद घेतले. ही रॅली माळीवेस, सुभाष रोड मार्गे आल्यानंतर रस्त्यात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, छत्रपती शिवाजी महाराज यांना पंकजाताईंनी अभिवादन केले. रॅलीत जिल्हाभरातून महायुतीचे कार्यकर्ते मोठया संख्येने उत्स्फूर्त सहभागी झाल्याचे पहायला मिळाले. ओपन वाहनातून निघालेल्या या रॅलीत पंकजाताईंनी हात उंचावून अभिवादन करत नागरिकांचे स्वागत स्विकारले. ठिकठिकाणी फुलांच्या वर्षावात त्यांचे स्वागत झाले. त्यांच्या स्वागताचे मोठमोठे बॅनर्सही शहरात झळकले होते. या उत्साहपूर्ण स्वागताबद्दल कृतज्ञता व्यक्त करत उपस्थितांना त्यांनी वंदनही केले. दरम्यान रॅली मार्गावर पंकजाताईंचे महिला भगिनींसह कार्यकर्त्यांनी पुष्पहार देऊन 'विजयीभव', 'पंकजाताई मुंडे तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है', कोण आली रे आली, महाराष्ट्राची वाघिण आली, अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. पंकजाताई मुंडे या आपल्या उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी दुपारी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल झाल्यानंतर त्यांना समर्थन देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर नगर रोडवर जिल्हाभरातून आलेल्या भाजप आणि महायुतीच्या कार्यकर्त्यांनी हलगीच्या निनादात जल्लोष करत भारतीय जनता पक्ष आणि पंकजाताई मुंडे यांच्या समर्थनार्थ प्रचंड घोषणाबाजी केली. यावेळी भाजप, शिवसेनेसह, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांचे ध्वज उंचावून कार्यकर्ते नृत्यात तल्लीन झाले होते. महत्त्वाचे म्हणजे बुधवारी दुपारी तापमानात प्रचंड वाढ झालेली असतानाही कार्यकर्त्यांनी पंकजाताईंबद्दलचे आपले प्रेम तसूभरही कमी होऊ दिले नाही.

महायुतीच्या नेत्यांचे एकसंघतेचे दर्शन;पंकजाताईंचा अर्ज दाखल करताना सर्वच नेत्यांची उपस्थिती

पंकजाताई मुंडे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना बीड जिल्ह्यातील भाजप महायुतीच्या सर्व नेत्यांनी उपस्थित राहून महायुती एकसंघतेचे दर्शन घडवले. पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह सर्व जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगराध्यक्ष, सरपंच ग्रामपंचायत सदस्यांनी उपस्थित राहून रॅलीमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. महत्त्वाचे आहे की, पंकजाताईंचा अर्ज दाखल करताना पुण्यातील महायुतीचे आ. सुनील शेळके, आ. माधुरी मिसाळ, आ. आश्रि्वनी जगताप, आ. उमाताई खापरे हे चार आमदार आवर्जून उपस्थित राहिले.

# नीलेश लंके फकीरच !

## जंगम मालमत्ता घटली; कर्जही वाढले

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीकांत चौरे**

**नगर :** लोकसभा निवडणूकीमध्ये महाविकास



आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांची सन २०१९ च्या तुलनेत स्थावर आणि जंगम मालमत्ता घटली असून त्यांचे कर्जही वाढले आहे ! राजकीय क्षेत्रातील व्यक्तींच्या मालमत्तेत पाच वर्षांच्या कालवधीमध्ये प्रचंड वाढ होत असताना लंके यांची झोळी मात्र रिकामीच असल्याचे मंगळवारी त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल करताना सादर केलेल्या प्रतिज्ञा पत्रावरून स्पष्ट झाले आहे. नीलेश लंके यांनी सन २०१९ मध्ये विधानसभेची निवडणूक लढविली. त्यांनी त्यावेळी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात त्यांची स्थावर मालमत्ता १५ लाख ३५ हजार १५३ रूपये इतकी होती. तर जंगम मालमत्ता ५८ लाख ५६ हजार ५२१ इतकी होती. सन २०१९ मध्ये त्यांच्यावर ३२ लाख २८ हजार ९८९ 989 रूपयांचे कर्ज होते. लंके यांनी लोकसभा निवडणूकीचा अर्ज मंगळवारी दाखल केला त्यावेळी त्यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात त्यांची स्थावर मालमत्ता सुमारे ४ लाखांनी वाढली आहे. १९ लाख २२ हजार २१० इतकी स्थावर असून जंगम मालमत्तेमध्ये मात्र कमालीची घट झाल्याचे प्रतिज्ञापत्रावरून दिसून येते. सन २०२४ मध्ये लंके यांच्या जंगम मालमत्तेत ३५ लाख २४ हजार २९५ रूपयांची घट झाली आहे. तर लंके यांच्यावरील कर्ज ३७ लाख ४८ हजार ७५७ इतके असून सन २०१९ च्या तुलनेत ते वाढले आहे.

**बँक ठेवी व इतर :** हातावरची रोख रक्कम ८१ हजार ४००,राणी नीलेश लंके ४० हजार २००, तेजस नीलेश लंके ५हजार, शिवम नीलेश लंके ६ हजार, स्टेट बँक सुपा शाखा बचत खाते शिल्लक ७ लाख ७६ हजार ८९६ रूपये, राणी लंके बँक ऑफ बडोदा बचत खाते ३१ हजार ८३४ रूपये, तेजस लंके बचत खाते ६ हजार ५६९, शिवम लंके बँक ऑफ बडोदा ४ हजार २७१ रूपये, साई मल्टीस्टेट पतसंस्था वाडेगव्हाण शाखा बचत खाते रूपये १२०

**बंधपत्रे, शेअर्स :** सेनापती बापट मल्टीस्टेट पतसंस्था शेअर्स १२ हजार ५१० रूपये, नगर अर्बन को ऑप बँक शेअर्स ८ हजार ४००

**संपत्तीचे विवरण :** हयुंदायी क्रेटा १३ लाख ५ हजार ८००, सोने, जडजवाहीर, चांदी नीलेश लंके १ लाख ४७ हजार १००, राणी लंके २ लाख ६ हजार २५०

**एकूण स्थुलमुल्य :** नीलेश लंके : २३ लाख ३२ हजार २२६ रूपये, राणी लंके २ लाख ७८ हजार १८४, हंगे येथे गट नं .८३२ नीलेश लंके यांच्या नावे येथे १० गुंठे

**कर्ज :** ३१ मार्च २०२४ अखेर कर्ज ७ लाख १३ हजार ७५७ स्टेट बँक ऑफ इंडिया कार लोन, असुरक्षित कर्ज ३० लाख३५ हजार ,३७ लाख ४८ हजार ७५७ रूपये .

**जंगम मालमत्ता :** नीलेश लंके २३ लाख ३२ हजार,२२६, राणी लंके २ लाख ७८ हजार २८४

**कार्यकर्त्याच्या कर्जाला जामीनदार :** साई मल्टिस्टेट पतसंस्थेकडून लंके यांचे कार्यकर्ते ईश्वर ब्राम्हणे यांच्या कर्जप्रकरणात आ . नीलेश लंके हे जामीनदार आहेत . कर्जदार ब्राम्हणे यांनी कर्ज वसुलीप्रकरणी नीलेश लंके यांचा धनादेश दिला होता . हा धनादेश न वटल्याने लंके यांच्यावर भा दं वि १३८ प्रमाणे लंके यांच्यावर गुन्हा दाखल आहे .

**शेतकरी आंदोलनाचा एकच गुन्हा :** एकीकडे खा . डॉ . सुजय विखे हे नीलेश लंके यांच्यावर गुंडगिरीचा आरोप करीत असले तरी लंके यांच्यावर केवळ एकच गुन्हा दाखल असून सुपा येथे कांद्याचे भाव कोसळल्याने कांदा निर्यात सुरू करण्यासाठी त्यांनी सुपा चौकात केलेल्या आंदोलनाबाबत त्यांच्यावर शेतकरी आंदोलनाचा केवळ एकच गुन्हा दाखल आहे . लंके यांच्या प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले असता खा . डॉ . विखे यांचा गुंडगिरीचा आरोप खोटा ठरतो .





# चंद्रपुरात वादळी वाऱ्यासह पावसाचा जोर

## मनपा प्रशासनाने तातडीने राबवली आपत्ती व्यवस्थापन मोहीम

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शहरात काल दि.२२ एप्रिल २०२४ रोजी संध्याकाळच्या सुमारास वादळी वाऱ्यासह पावसाचे आगमन झाल्यानंतर शहरात अनेक ठिकाणी झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या. सदर घटनेची माहिती मनपा प्रशासनास कळताच तातडीने कोसळलेली झाडे हटविण्याची मोहीम हाती घेण्यात आली असून अधिकांश परिसर रहदारीस मोकळा करण्यात आला आहे.

काल वादळात शहरातील तुकूम, बंगाली कॅम्प,रयतवारी कॉलोनी, हवेली गार्डन छत्रपती नगर,वडगाव,सरकार नगर इत्यादी परिसरात झाडे पडण्याच्या घटना घडल्या.सुदैवाने यात जीवित हानी अथवा कुणी जखमी होण्याची घटना घडली नाही. अनेक जागी झाडे पडल्याने रहदारीस अडथळा होईल हे लक्षात घेता मनपा अग्निशमन विभाग,उद्यान विभाग व स्वच्छता विभागाच्या कर्मचाऱ्यांद्वारे सदर झाडे हटविण्याची मोहीम रात्रीच हाती घेण्यात आली. शहराच्या विविध भागातील १५ ते १६ कोसळलेली झाडे हटवुन रात्रीच रस्ता मोकळा करण्यात आला तर उर्वरीत ठिकाणची झाडे हटविण्याचे काम सुरु आहे. काल आलेल्या वादळात वाहणारे वारे हे अत्याधिक गतीने वाहत होते तसेच पावसाचाही जोर अधिक असल्याने अनेक ठिकाणी नागरीकांना सुरक्षित स्थळी आश्रय घ्यावा लागला.

शाळा पुढील कारणांमुळे आरटीई 25 टक्के प्रवेश नाकारू शकेल : अवैध निवासाचा पत्ता, अवैध जन्मतारखेचा दाखल, अवैध जातीचे प्रमाणपत्र, अवैध उत्पन्नाचे प्रमाणपत्र, अवैध फोटो आयडी, अवैध दिव्यांग प्रमाणपत्र. ज्या बालकांनी यापूर्वी आरटीई 25 टक्के अंतर्गत शाळेत प्रवेश घेतला असल्यास सदर बालकाला पुन्हा अर्ज करता येणार नाही. प्रवेश अर्ज भरताना याबाबत चुकीची माहिती भरून पुन्हा प्रवेश घेतल्याचे आढळल्यास सदरील प्रवेश रद्द करण्यात येईल. तसेच पालकांनी एकच परिपूर्ण अर्ज भरावा, अनेक अर्ज भरू नयेत. अनेक अर्ज भरल्याचे निदर्शनास आल्यास सदर अर्ज लॉटरीसाठी विचारात घेतला जाणार नाही. अशा पालकांचे अर्ज रद्द करण्यात येतील याची नोंद घ्यावी. पडताळणी समितीद्वारे प्रवेशपात्र बालकांच्या प्रवेशाकरिता आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल. गटशिक्षणाधिकारी यांनी प्रत्येक बालकाला 3 वेळा प्रवेशाकरिता संधी देवून पालकांनी संपर्क केला नाही अथवा प्रवेशासाठी आले नाही तर विहित मुदतीत आरटीई पोर्टल वर NOT APPROCH करण्यात येईल. पडताळणी समिती द्वारे रहिवासी पत्ता, गुगल वरील पत्ता व वय याबाबत पात्र विद्यार्थ्यांची अचूक खात्री करण्यात येईल. सामाजिक वंचित संवर्गातील विद्यार्थ्यांकरिता जात प्रमाणपत्राची तर आर्थिक दुर्बल संवर्गातील विद्यार्थ्यांकरिता उत्पन्न प्रमाणप्रत्राची पडताळणी करण्यात येईल. प्रतिक्षा यादीमध्ये नाव आहे याचा अर्थ प्रवेश निश्चित होईलच असा नाही. पालकांनी केवळ SMS वर अवलंबून न राहता RTE PORTAL वर वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे अवलोकन करावे व सदरील माहितीचा लाभ घ्यावा. विहित मुदतीनंतर प्रवेशासाठी कोणत्याही पालकांच्या अर्जाची किंवा निवेदनाची दखल घेतली जाणार नाही, याची सर्व पालकांनी गांभिर्याने नोंद घ्यावी. तरी इच्छूक व पात्र पालकांनी आपल्या पाल्याचे सदर ऑनलाईन अर्ज विहित कालावधीमध्ये भरावे, असे आवाहन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी केले आहे.

# केंद्र सरकारला सवाल

आधुनिक केसरी

पतंजली आयुर्वेद लिमिटेडच्या दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींशी संबंधित खटल्याची सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार आणि राज्य परवाना प्राधिकरणांना फटकारले. आयुर्वेदिक आणि आयुषशी संबंधित जाहिरातींवरील कारवाई रोखण्यासाठी आयुष मंत्रालयाने राज्ये व केंद्रशासित प्रदेशांच्या परवाना प्राधिकरणांना पत्र का पाठविले, असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने केंद्राला विचारला. न्यायमूर्ती हिमा कोहली आणि अहसानुद्दीन अमानुल्ला यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. औषधे व सौंदर्यप्रसाधने अधिनियम, १९४५ च्या नियम १७० नुसार दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींवर कारवाई करण्यात येते. आयुष मंत्रालयाने २९ ऑगस्ट २०२३ मध्ये राज्यांना पत्र पाठवून औषधांचा परवाना देणारे अधिकारी आणि आयुषचे औषधे नियंत्रकांना नियम १७० वगळण्याचे निर्देश दिले. नियम हटविण्यासाठी २५ मे २०२३ रोजी केलेल्या आयुर्वेदिक, सिद्ध आणि युनानी औषधे तांत्रिक सल्लागार मंडळाच्या (एएसयूडीटीएबी) शिफारशींच्या आधारे या पत्रांद्वारे सर्व परवाना अधिकाऱ्यांना नियम १७० नुसार फसव्या जाहिरातींवर कारवाई न करण्याचे निर्देश दिले. न्या. कोहली यांनी याबाबत चिंता व्यक्त करत केंद्र सरकारवर ताशेरे ओढले. नियम १७० हटविण्याचा अर्थ काय? नियम १७० नुसार जाहिरातींवर प्रसिद्ध होण्यापूर्वी प्रतिबंध लावण्यात येत होता. मात्र ते जर हटविले तर औषधे व जादुई उपचार अधिनियमानुसार जाहिराती प्रसिद्ध झाल्यानंतर त्या अयोग्य आहेत की योग्या याची तपासणी होईल. हे अधिक चिंताग्रस्त आहे, असे न्या. कोहली यांनी सांगितले. योगगुरू रामदेवबाबा आणि पतंजली आयुर्वेद संस्थेचे संचालक आचार्य बाळकृष्ण यांनी फसव्या जाहिरातीप्रकरणी एक आठवड्याच्या आत जनतेची बिनशर्त माफी मागावी, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. त्यानुसार पतंजलीने सोमवारी काही वृत्तपत्रांमध्ये माफीनामा प्रसिद्ध केला. मात्र न्यायालयाने या प्रकरणी पुन्हा पतंजलीला फटकारले. 'तुम्ही केलेल्या जाहिरातींच्या आकाराएवढा हा माफीनामा आहे का?' असा सवाल न्यायालयाने केला. या जाहिरातींसाठी दहा लाखांचा खर्च आल्याची माहिती पतंजलीचे वकील मुकुल रोहतगी यांनी दिली. ६७ वृत्तपत्रांमध्ये माफीनाम्यासंबंधी जाहिरात प्रसिद्ध झाल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पुढील सुनावणी आता ३० एप्रिल रोजी होणार असून पुढच्या सुनावणीत प्रसिद्ध झालेल्या माफीनाम्याचं कात्रण सादर करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले.

# देश सुजलाम सुफलाम करण्यात बाबासाहेबांचे योगदान



भीमराव सरवदे
संपर्क : ९४०५४६६४४१

आधुनिक केसरी

**आधुनिक भारताच्या निर्मितीत मोलाचे योगदान देणाऱ्या काही मोजक्याच प्रभावी व्यक्ती होत्या. त्यापैकी बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विशेष स्थान आहे. निखळ मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर ते एक थोर विद्वान, राजकारणी, देशाच्या राज्यघटनेचे मुख्य शिल्पकार आणि मुख्य म्हणजे शोषितांचे नेते अशी ख्याती ते मिळवू शकले. अनेक बाबतीत त्यांनी आपल्या नामवंत समकालीनांपेक्षा आपले वेगळे व्यक्तिमत्व उभे केले होते. एक महान विद्वान, सामाजिक क्रांतिकारक आणि राजकारणी होण्याचा गौरव त्यांनी प्राप्त केला असून हा बहुआयामी व्यक्तित्वाचा संगम क्वचितच पाहायला मिळतो.**

कायदा, राज्यघटना, अर्थकारण, समाजशास्त्र, राजकारण आणि तुलनात्मक धर्म अशा विविध क्षेत्रांचा त्यांचा अभ्यास होता. देश सुजलाम सुफलाम करण्यात त्यांचे खूप मोठे योगदान होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशासाठी दिलेले योगदान अत्यंत उच्च कोटीतील होते; परंतु त्या कामाची प्रसिद्धी व्यापक स्वरूपात झाली नाही व तथाकथित लेखकांनी मनापासून दखलही घेतली नाही. विकासाची काही धोरणे आखण्यात आणि नियोजनात त्यांचा प्रत्यक्ष सहभाग आणि भूमिका हे महत्वाचे योगदान अनुल्लेखाने दडपण्याचा प्रयत्न झाला. १९४७-५१ या काळात स्वतंत्र भारताच्या केंद्रीय मंत्रिमंडळात कायदामंत्री म्हणून आणि त्याआधी व्हाईसरॉयच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य म्हणून, १९४२-४६ दरम्यान कामगार, पाटबंधारे आणि ऊर्जा खात्याची जबाबदारी सांभाळणारे बाबासाहेब किमान दोन वेळा धोरण निर्मितीत थेट सहभागी झाले होते. या पदावर राहून त्यांनी देशाच्या विकासात भरीव योगदान दिले असले, तरी आश्चर्याची बाब म्हणजे त्यांच्या जीवनातील या महत्वपूर्ण पैलूची फारसी चर्चा झालेली आढळून येत नाही. १९४२ मध्ये जेव्हा बाबासाहेबांनी सिंचन आणि विज विभागाची सूत्रे हाती घेतली, राष्ट्रीय पातळीवर आर्थिक नियोजनाच्या संकल्पनेच्या उत्क्रांतीसाठी आणि या संकल्पना स्वीकारण्यासाठी तो निर्णायक काळ होता. भारताची पुनर्बांधणी आणि आर्थिक विकासाची युद्धोत्तर योजना तेव्हा आकार घेत होती. जलसंपदा आणि विद्युत ऊर्जा विकाससंदर्भातील धोरण आखण्यात आले आणि या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून त्याला निश्चित स्वरूप देण्यात आले. सिंचन, जलमार्ग आणि जलपरिवहनाच्या विकासासाठी बाबासाहेबांच्या कामगार विभागाने अक्षरशः शून्यापासून अखिल भारतीय नियोजन सुरू केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कामगार खात्याचे प्रमुख असल्याने वरील धोरणात्मक नियोजनांसाठीची पावले उचलण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. अर्थकारण, राजकारण आणि घटनात्मक कायदा या विषयांचे सखोल ज्ञान असलेल्या बाबासाहेबांनी केंद्र सरकार व त्यांच्या विभागाला जल व ऊर्जा धोरण व नियोजनात मदत केली. कामगार विभागाने एक धोरण निवेदन तयार केले होते, ज्यात सिंचन, जलमार्ग, ड्रेनेज, विद्युत ऊर्जा आणि अंतर्देशीय जलवाहतूक, इत्यादींच्या विकासाबाबत आरसीसी आणि प्रांतीय सरकारांकडे केंद्र सरकारचा दृष्टिकोन स्पष्ट केला. सिंचन, जलमार्ग आणि जलविद्युत ऊर्जेचा विकास हा देशाच्या औद्योगिक आणि कृषी विकासासाठी मूलभूत असल्याचे या धोरणात म्हटले होते. व्यापक सिंचन, मृदसंधारण आणि पूर नियंत्रण यावर अन्नपुरवठा आणि लोकांची समृद्धी थेट अवलंबून होती. अन्नधान्याचा पुरवठा वाढविण्यासाठी व अधिकाधिक जमीन लागवडीयोग्य करण्यासाठी सिंचनाच्या मोठ्या व मध्यम योजनांची गरज होती. फेब्रुवारी १९४५ मध्ये कलकत्ता येथे झालेल्या दुसऱ्या आंतरप्रांतीय परिषदेत कामगार विभागाने दामोदर प्राधिकरणाच्या स्थापनेसाठी दोन पर्यायी मॉडेल्स विचारार्थ तयार केले होते. कामगार खात्याच्या अथक प्रयत्नांचा परिणाम असा झाला की अखेर केंद्र सरकार आणि दामोदर खोरे प्रकल्पात सहभागी होणाऱ्या बिहार आणि पश्चिम बंगाल सरकारे यांच्यात प्राधिकरण स्थापन करण्याचा करार झाला. १९४८ मध्ये संविधान सभेने खोऱ्याच्या विकासासाठी निमस्वायत्त महामंडळाची स्थापना



व नियमन करण्याची तरतूद करणारा दामोदर महामंडळ कायदा केला तेव्हा त्याला कायदेशीर बळ मिळाले. दामोदर व्हॅली कॉर्पोरेशन ही अशा प्रकारची पहिली चळवळ होती. या संस्थेच्या स्थापनेनंतर आंतरराज्यीय नद्यांवरील सिंचन व वीज प्रकल्पांचे व्यवस्थापन व नियंत्रणाचा प्रश्न अखेर सुटला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली पाटबंधारे व ऊर्जा विभागाला हे श्रेय जाते कारण भारतात प्रथमच १९४५-४७ मध्ये दामोदर खोरे व महानदी खोऱ्यासाठी बहुउद्देशीय विकासाच्या खोरेनिहाय योजना मांडण्यात आल्या. १९४८ मध्ये जेव्हा भारताच्या संविधान सभेने बिहार व पश्चिम बंगाल प्रांतात दामोदर खोरे स्थापन करण्यासाठी दामोदर खोरे महामंडळ कायदा लागू केला, त्यात दामोदर खोरे म्हणजे दामोदर नदी आणि उपनद्यांचे खोरे अशी व्याख्या करण्यात आली आहे. १९४८ मध्ये संमत झालेल्या वीज (पुरवठा) कायद्यानुसार, राज्य वीज मंडळांनी प्रस्तावित केलेल्या कोणत्याही नदीकामांमुळे सिंचन, जलपरिवहन आणि पूर नियंत्रणाच्या गरजेनुसार वीजनिर्मितीसाठी नदी आणि तिच्या उपनद्यांच्या सर्वोत्तम अंतिम विकासास बाधा येईल का, हे तपासण्याची जबाबदारी केंद्रीय विद्युत प्राधिकरणाची होती. अशा प्रकारे जास्तीत जास्त बहुउद्देशीय नदी खोरे विकासावर भर देण्यात आला, त्यासाठी १९४४-४६ मध्ये दामोदर, महानदी, सोन आणि इतर नद्यांवरील नदी खोरे प्रकल्पांच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या विभागाने पायाभरणी केली होती. या सर्वांमध्ये दामोदर नदीच्या खोऱ्यावर धरण बांधण्याची महत्त्वपूर्ण योजना होती. हिमालयातून उगम पावणारी दामोदर नदी पावसाळ्यात ओडिशा (पूर्वीओरिसा) आणि बिहारच्या प्रदेशासाठी शाप बनली होती. हे दोन्ही प्रदेश त्या काळी बंगाल प्रांताचा भाग होते. साधारणपणे दर दोन वर्षांनी दामोदर नदीच्या पुरामुळे ओडिशा आणि बिहारमधील अनेक गावे वाहून जात होती. १८५९ ते १९४३ या कालावधीत बिहारच्या जनतेला १४ भीषण पूरपरिस्थितीला सामोरे जावे लागले होते. दामोदर नदीला १७ जुलै १९४३ रोजी प्रचंड पूर येऊन ७० गावे पुराच्या पाण्याखाली आली होती. पुरामुळे १८ हजार पक्की घरे उद्ध्वस्त झाली होती, बहुतांश जनावरे वाहून गेली, लाखो लोक बेघर झाले. त्याशिवाय बंगाल प्रांताचा भारताशी संपर्क पूर्णपणे तुटला होता. ही नैसर्गिक आपत्ती आली असताना नेमके याच काळात दुर्दैवाने दुसरे महायुद्ध सुरू झाले आणि त्याच वेळी जपानने कलकत्ता शहरावर बॉम्बचा स्फोट घडवून आणला. त्या बिकट परिस्थितीमुळे बॉम्ब तसेच पूरग्रस्त भागात अन्नधान्य व इतर दैनंदिन गरजा पुरविण्यास सरकार हतबल झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची आक्रमक कार्यक्षमता लक्षात घेऊन बाबासाहेबांना या प्रकरणात तातडीने लक्ष घालण्याची विनंती केली. बाबासाहेबांनी ताबडतोब ओडिशातील कटक शहराकडे धाव घेतली आणि नोव्हेंबर १९४३ मध्ये केंद्र तसेच राज्य सरकारच्या संबंधित अभियंते व अधिकाऱ्यांची तातडीची बैठक बोलावली. त्यानंतर त्यांनी पुराच्या पाण्याचा सकारात्मक वापर करण्याची सूचना बैठकीत केली. सभेचा समारोप करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या वैज्ञानिक दृष्टीकोनातून म्हणाले की, आपण पुराला शाप म्हणून नव्हे तर वरदान म्हणून स्वीकारले पाहिजे! पावसाचे पाणी मानवी जीवनासाठी भविष्यातील वापरासाठी जतन करण्याची सूचना त्यांनी केली आणि हे पाणी वाहतूक सेवेसाठी वापरण्यासाठी विचार करण्याची सूचनाही त्यांनी केली. कटक येथे ही बैठक बोलवण्यापूर्वी डॉ. विश्वेश्वरय्या यांनी म्हैसूर राज्यातील तुंगभद्रा नदीवर बांधलेले धरण, पंजाब प्रांतातील सिंचन प्रकल्प आणि अमेरिकेतील टेनेसी नदीच्या खोऱ्यात बांधण्यात आलेल्या जगातील सर्वात मोठ्या धरणावरील पुस्तकांचा सखोल अभ्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला. तेव्हा त्यांनी असा निष्कर्ष काढला की, अमेरिकेतील टेनेसी धरण प्रकल्प आणि दामोदर नदी खोरे प्रकल्प हे दोन्ही प्रकल्प एकसमान आहेत. धरण बांधणी शास्त्रावरील तांत्रिक ग्रंथांचा अभ्यास केल्यानंतर टेनेसी धरणाच्या धर्तीवर दामोदर धरण प्रकल्प उभारण्याचा निर्णय बाबासाहेबांनी घेतला. भारताच्या विकासातील हे मोठे योगदान प्रचंड संघर्षातून पुढे आलेले आहे. भारताला जगातील सर्वोत्तम कौशल्य मिळावे या प्रामाणिक उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतातील ब्रिटिश साम्राज्याचे सर्वोच्च अधिकारी व्हॉईसरॉय लॉर्ड वेवेल यांच्याशी संघर्ष करावा लागला होता. **क्रमशः**

# मर्यादा हीच लक्ष्मणरेषा असल्याने मर्यादा पाळा पश्चात्ताप टाळा



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**मर्यादा हिच लक्ष्मण रेषा असते ज्याला लक्ष्मण रेषा समजली तो सुरक्षित असतो. लक्ष्मण रेषेची मर्यादा वेळीच ओळखली तर पश्चात्ताप टाळता येत नाही. आपल्या आजुबाजुला अथवा सभोवताली घडणाऱ्या प्रत्येक छोट्या मोठ्या घटनेचे घडामोडीच बारकाईने जर निरीक्षण केले तर त्याच मुळ हे मर्यादेशी जोडलेलं असतं आपल्या लाक्षात येईल. हित झालेल निदर्शनास आल तर मर्यादा पालन केलेल असत आणि अहित झालं तर मर्यादा ओलांडलेली असते हे अगदी सुस्पष्ट आहे. म्हणजेच आपल्या हिताला व अहिताला थेटपणे मर्यादेची किनार असतेच असते. आयुष्यात पश्चात्ताप टाळायचा असेल तर क्षणोक्षणी पावलो पावली मर्यादा हि पाळली गेलीच पाहिजे.**

दैनंदिन जीवनात मनातील सुप्त इच्छा पुर्ण करताना अथवा त्यासाठी प्रयत्नशील असताना सचेत दक्ष असण हितकारक असत.जीवनात आपल्या खुप काही अपेक्षा असतात वेळेनुसार निर्माण होणाऱ्या इच्छा सुद्धा अनंत असतात. त्या इच्छापूर्ती साठी आपल्याला काही कर्म हि करावी लागतात हिच कर्म करत असताना अथवा आपल्या इच्छेनुसार जीवन जगताना प्रत्येक क्षणाचा आनंद घेत असताना एक बाब खुप महत्वाची आहे. ती बाब म्हणजे आपण करत असलेल कार्य हे मर्यादेत असल पाहिजे.म्हणजे कोणत्याही परिस्थितीत मर्यादा ओलांडली जाणार नाही याची काळजी दक्षता घेतली गेलीच पाहिजे.मर्यादा हिच आपली सुरक्षितता सुरक्षा रक्षक कवच असल्याने त्याची जाणीव ठेवून आचरण केल तर मग मात्र पश्चात्ताप करण्याची आवश्यकता पडणार नाही.युग कोणतही असो मर्यादा हिच लक्ष्मण रेषा असते.आणि एकदा का लक्ष्मण रेषा ओलांडली कि मग मात्र आपली काही खैर नसते. भगवान प्रभु श्रीराम व श्री लक्ष्मण हे मर्यादेचे प्रतिक असून प्रभु श्रीराम यांचे बंधू लक्ष्मण यांनी आखलेली लक्ष्मण रेषा ही फक्त एकट्या माता सीतेसाठी नव्हती तर ती संबंध मानवी मर्यादा निर्धारित करणारी लक्ष्मण रेषा होती.आपल्या वहिणी व भगवती माता सीता यांच्या रक्षणासाठी त्यांनी जी रेषा ओढली होती ती जगातील सगळ्यात बलशाली योद्धा रावण सुद्धा पार करु शकला नाही.रावणाने कपट निती करून भिक्षा मागितली आणि अतिथी उपाशी परत जाऊ नये म्हणून भगवती सीता यांना लक्षमण जी यांची अज्ञा मोडुन लक्षमण रेषा ओलांडून भिक्षा वाढली त्याच वेळी कपटी रावणाने देवी भगवती सीता मातेच हरण केल. माता सीता यांनी रेषा ओलांडून भिक्षा वाढली नसती तर अनर्थ टळला असता.लक्षमण रेषा हि मर्यादेच प्रतिक असल्याने ती मर्यादा पाळली पाहिजे.आपण दैनंदिन जीवनात आचरण करत असताना सदैव सचेत राहुन मर्यादेत आचरण केले तर कोणत्याही प्रकारची अडचण अथवा चिंता करण्याची आवश्यकता भासत नाही पण जर आपण मर्यादा ओलांडली तर मग आपली खैर नसते. आपल्या अडचणी संकटं याच मुळ हे मर्यादेच्या कक्षेत दडलेले असत.जो पर्यंत आपण मर्यादेत आहेत तो पर्यंत आपण सुरक्षित आहेत हा नैसर्गिक सिद्धांत आहे एकदा का हा सिध्दांताच उल्लंघन झाल तर आपण आपलं सुरक्षा कवच स्वतः हुन तोडल कि मग मात्र त्याचे होणारे अनिष्ट परिणाम सुद्धा आपल्या वाट्याला येणारच या मध्ये एतकिंचित सुद्धा किंतु परंतु नाही.सद्सद्विवेक बुद्धी नुसार विचार केला तर मर्यादा समजते . सद्बुद्धी लुप्त झाली कि अंहकार जागृत होऊन तो मर्यादा उल्लंघन करण्यास भाग पाडते.आणि एकदा का मर्यादेची लक्ष्मण रेषा ओलांडली गेली कि मग मात्र अहितकारक घडत . दुष्ट प्रवृत्ती शक्ति कितीही बलशाली प्रभावी असली तरी सुद्धा मर्यादे समोर प्रभाव हिन ठरते.मर्यादा हिच आपली सुरक्षितता असते.याची जाणीव ठेवून आचरण ठेवलं तर आपल्याला जीवनात तुफान येणार नाही हे मात्र निश्चित आहे.जीवन जगताना काही नैसर्गिक नियामांच पालन करणं अपेक्षित असतं हे पालन करताना निति न्याय धर्म संस्कार हे महत्वाचे असतात त्याच बरोबर अज्ञानाधरक असणं हे खुप गरजेचं आहे. तसंच प्रत्त्येक बाब पुर्ण करताना ती मिळविण्यासाठी प्रयत्न करत असताना समोरील मर्यादेवर आपलं लक्ष्य असलं पाहिजे कारण मिळालेलं टिकल पाहिजे तरच त्याचा उपयोग आहे.आपण मर्यादेत राहून आचरण करत जे जे काही मिळाणार ते आयुष्यभर टिकण्याची हमी असते पण मर्यादा ओलांडली आणि काही हि मिळवलं प्राप्त केलं अर्जित केल तर त्या बाबीच आयुष्य क्षणिक असत हे समजणं कठीण आहे पण सत्य आहे सत्य समजलं तर जीवन सुलभ होत.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# भाजपाच्या विरोधात जनता एकवटली

## भोकरला उद्धव ठाकरेची पत्रकार परिषद

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** मागील काळात महाविकास आघाडी सरकारने लोकहिताचे निर्णय घेतल्याने जनता समाधानी होती. दरम्यान काही आमच्याच लोकांना पोटसुळ ऊठलं आणि त्यांनी गद्दारी केली. आता महाविकास आघाडीने वज्रमूठ बांधली आहे. महाराष्ट्रात आमच्या ४८ जागा येतील. राज्यातील जनता भाजपाच्या विरोधात एकवटली आहे, अशी माहिती (उबाठा गटाचे) शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांनी बुधवारी (ता २४) पत्रकार परिषदेत बोलताना दिली आहे. हदगाव येथील जाहीर सभेला जाण्यापूर्वी शहरातील तलाव रिसॉर्ट हॉटेल येथे पत्रकाराशी संवाद साधला त्यावेळी ते म्हणाले की, मोदी सरकारच्या हुकूमशाही विरुद्ध जनतेमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला असून सर्वसामान्य जनता महाविकास आघाडीच्या उमेदवारांना पसंती देत असल्याचे समजते. चारसो पारचा नारा देऊन भारतीय राज्य घटना बदल्यानाचा त्यांचा डाव आहे. मोदी सरकारने आमच्या पक्षाच्या सातबारा वरील नावात खाडाखोड करून गद्दारांची नावे टाकली, आम्हाला धोका दिला. अशा प्रवृत्तींच्या मनमानी कारभाराविरुद्ध जनता एकवटली आहे. सर्वसामान्यांची सुरक्षितता आज वाऱ्यावर आहे. शेतकऱ्यांचे कर्ज माफ करून आम्ही न्याय दिला आता भाजपानी शेतकऱ्यांना वा-यावर सोडल्याचा आरोप त्यांनी केला. यावेळी नांदेड लोकसभेचे काँग्रेसचे उमेदवार वसंत चव्हाण, माजी मंत्री कमल किशोर कदम, माजी आमदार हनमंत पाटील बेटमोगरेकर, काँग्रेस जिल्हाध्यक्ष बी.आर. कदम, शिवसेना जिल्हाध्यक्ष बबन बारसे, बाळासाहेब पाटिल रावणगावकर, प्रकाश देशमुख भोसीकर, गोविंद बाबा गौड पाटील, सुभाष किन्हाळकर यांची उपस्थिती होती.

**जनता गद्दार होणार नाही :** अशोक चव्हाण हे भाजपवाशी झाल्याने काँग्रेस पक्षाला नवी झळाळी प्राप्त झाली आहे. त्यांनी काँग्रेस पक्षातील नवीन चेहरे अडवून ठेवले होते. काही झालं तरी जनता गद्दार होणार नाही हे आम्हाला माहित आहे. आदर्श घोटाळा प्रकरणातील निकाल लागायचा आहे. शहिदांच्या फसवणुकीत भाजपा देखील सहभागी असल्याचे दिसत आहे, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी अशोक चव्हाण यांच्या बाबतीत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले आहे.

# अधिकाऱ्यांच्या वतीने खासगी वाहनांची चौकशी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** सध्या देशभरात लोकसभा निवडणुका लागल्या आहेत, भारतीय निवडणूक आयोगाच्या वतीने मतदान प्रक्रिया पार पडण्यासाठी सर्व यंत्रणा कामाला लागली आहे. औरंगाबाद लोकसभा मतदारसंघासाठी व जालना लोकसभा मतदारसंघासाठी 13 मे रोजी मतदान होणार आहे. परंतु भारतीय निवडणूक आयोगाच्या वतीने व औरंगाबाद जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शासकीय अधिकारी निवडणूकीचा कामकाज पार पाडत आहे.

यातच फुलंब्री व खुलताबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दोन्ही तालुक्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी तालुक्यातील विविध गावांतील फाट्यावर चेकपोस्ट म्हणून मंडप टाकण्यात आले आहे.

दररोज येणारी व जाणाऱ्या खासगी वाहनांची चौकशी केली जात आहे. निवडणुकीच्या काळात मतदारांना आकर्षित करण्यासाठी उमेदवार विविध मार्ग अवलंबता, कोणी पैसे वाटतात तर कोणी दारु पाजतात तर कोणी हॉटेल बुक करून आपल्या कार्यकर्त्यांना जेऊ घालतात. दारु गोळा शस्त्रसाठा याची चौकशी व्हावी यासाठी महसूल पथक व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पथकाच्या वतीने खासगी वाहनांची चौकशी करण्यात येत आहे. फुलंब्रीचे तहसीलदार डॉ. कृष्णा कानगुले यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल पथक कामगिरी करत आहे.याप्रसंगी आर .के. गायकवाड, एस. डी. सुरसे, एस. व्ही. पाटील, पोलीस अंमलदार जे.जी. शेख यांच्यासह आदी फुलंब्री खुलताबाद रोडवरील किनगाव फाट्यावर खासगी वाहनांची चौकशी करत आहे.

# 'परंपरा'च्या निमित्ताने आयुष्य आणि परंपरा यातील संघर्ष रुपेरी पडद्यावर झळकणार

## अनेक आंतरराष्ट्रीय महोत्सवात गौरवलेला परंपरा चित्रपट २६ एप्रिल रोजी प्रेक्षकांच्या भेटीला

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** समाजाने जबरदस्तीने लादलेल्यापरंपरेचा एका कुटुंबावर होणारा परिणाम या आशयसूत्रावर बेतलेला "परंपरा" हा चित्रपट२६ एप्रिल रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या चित्रपटाचा ट्रेलर लाँच करण्यात आला असून, उत्तम अभिनय, श्रवणीय संगीत, आशयघन कथानक असलेल्या या चित्रपटाविषयी या ट्रेलरने उत्सुकता निर्माण केली आहे.

हरीश कुमार आणि अँड्र्यू रिबेलो यांच्या स्टार गेट मूव्हीज या निर्मिती संस्थेअंतर्गत "परंपरा" या चित्रपटाची निर्मिती केली असून फैजल पोपरे हे या चित्रपटाचे सहनिर्माते आहेत. तर दिग्दर्शन प्रणय निशाकांत तेलंग यांचे आहे. अभिनेते मिलिंद शिंदे आणि अभिनेत्री वीणा जामकर यांच्यासह प्रकाश धोत्रे, अरुण कदम, नम्रता पावसकर, किशोर रावराणे, जयराज नायर, रोहित चव्हाण, प्रशांत नेमण,




भूषण घाडी, मास्टर मच्छिंद्र, दिवंगत अभिनेते जनार्दन परब यांचा दमदार अभिनय हे या चित्रपटाचं वैशिष्ट्य आहे. प्रतिकूल परिस्थितीतही परंपरेच्या जपणुकीवर लक्ष केंद्रित करणारा हा चित्रपट आहे. विशेषतः महाराष्ट्रातील, जिथे सांस्कृतिक वारसा खूप महत्त्वाचा आहे. प्रेक्षकांच्या मनात खोलवर परिणाम करणारं कथानक या चित्रपटात मांडण्यात आलं आहे. चित्रपटची पटकथा प्रणय निशाकांत तेलंग आणि संजय सावंत यांची असून छायाचित्रण निशा तेलंग यांनी केले आहे. मंगेश कांगणे यांनी लिहिलेल्या गीतांना आनंद मेनन यांचे मधुर संगीत लाभले आहे. श्रीकांत तेलंग यांनी संकलक म्हणून काम पाहिले आहे तर पार्श्वसंगीत विजय गवंडे यांचे आहे.

"परंपरा" एक समृद्ध सिनेमॅटिक अनुभव देण्यास तयार आहे.

एकंदरीत 'परंपरा' हा चित्रपट केवळ मनोरंजनच नाही, तर आजच्या बदलत्या जगात वारसा आणि परंपरेचे महत्त्व दर्शवणारा आहे. त्याशिवाय ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबाचं जगणं, सामाजिक ताण याचं दर्शनही हा चित्रपट घडवतो. अनेक आंतरराष्ट्रीय महोत्सवात गौरवलेला हा चित्रपट प्रेक्षकांना नक्कीच अंतर्मुख करेल यात शंका नाही.



# बल्लारपुरात हनुमान जन्मोत्सव व भोजनदान

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** पोलीस निरीक्षक असिफ रजा साहेब यांचा उपस्थित भोजनदान करण्यात आले. डॉ. राजेंद्र प्रसाद वॉर्ड शाहिद हमीद अब्दुल चौक इथे हनुमान जन्मोस्तव निमित्त मोट्या संख्येने भोजन स्वाद नागरिकांनी घेतला उपस्थित. मोहित डंगोरे जिल्हा उपाध्यक्ष युवामोर्चा भाजप उमेश कुंडले शहरअध्यक्ष मनसे सत्यनारायण खेंगर बजरंग दल, संजय पाटील, विनोद पिंपलकर, प्रदीप झामरे, योगेश हांडे, नाजूक शेंडे, शुभम दुबे,नीरज दुबे, मंथन यादव, गोविंद सिंग,रोशन गुरुनुले, रोहित कवाडे, समीर मेश्राम, गौरव केशकर,यश अनमदवार, अंकित ताजने, सुरज गुरुनुले, हर्ष येटावार,बादल मेश्राम, शुभम कंनोजवार, निलेश ताडूलवार व महिला मध्ये सुषमा चवरडोल, शिल्पा पिंपळकर, सुवर्णा पाटील,सुलभा खोडके, अनिता चव्हाण आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# शांताराई महाविद्यालयातील नवीन पुणे पॅटर्ननुसार नवीन शैक्षणिक पद्धती

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील ताजनापुर येथे प्रा. अंकुश गायकवाड यांनी शांताराई विघालय व कनिष्ठ महाविद्यालय ताजनापुर येथील नवीन पुणे पॅटर्ननुसार नवीन शैक्षणिक पद्धती अवलंबनासाठी नियुक्त केलेल्या) डॉ. विकास वाकचौरे सर M. SC. B. ED. PH. D चीफ ऍडमिनिस्ट्रेटर यांचा सत्कार करून यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच खालील विषयावर चर्चा करण्यात आली. समर व्हॅकेशन, व बेसिक आणि ऍडव्हान्स फौंडेशन क्लासेस सर्व वर्गांकरिता,याविषयी मार्गदर्शन . करण्यासाठी गायकवाड सरांनी त्यांना दरेगाव येथे आमंत्रित केले आहे. मार्गदर्शकः1)डॉ. विकास वाकचौरे सर M. SC. B. ED. PH. Dचीफ ऍडमिनिस्ट्रेटरशांताराई विद्यालय व ज्यू. कॉलेज ताजनापूर (2)प्राचार्य :श्री. राठोड सर (3) विद्या गोयल मॅम(4) प्रिया रणदिवे मॅम (5) प्रीतम पटेल मॅम (6) सुनंदन राणे मॅम.सर्व शिक्षक आणि शिक्षेकतर कर्मचारी उपस्थित होते.





# शेलगाव येथे आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**साईनाथ हमदे**

**उमरी :** तालुक्यातील मोजे शेलगाव येथे भीम जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सर्व प्रथम डॉ बाबासाहेब आंबेडकर तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमाची पुष्प पूजा दीप पूजा धूप पूजा व पंचशील ध्वजारोहण गावचे उपसरपंच प्रतिनिधी संजय कदम यांच्या हस्ते संपन्न झाला त्यानंतर सामूहिक रित्या त्रिशरण पंचशील गातेच पठण करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते तथा पत्रकार गंगाधरराव सवई सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार जिरोना ग्रामपंचायत सदस्य डी.जी. तूपसाखरे पत्रकार संरक्षण समिती जिल्हा कार्यकारणी सदस्य तथा पत्रकार कैलास सोनकांबळे यांची उपस्थिती होती

शेलगाव येथील बालकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी पोलीस पाटील प्रतिनिधी दिगंबर पाटील कवळे, मारुती इंगळे भीमराव वाघमारे जयंती मंडळाचे, उपाध्यक्ष माधव उर्फ बादल भुजंगराव हनवते चंद्रकांत वाघमारे, भारतरत्न हनवते, नागसेन हनवते, चंद्रकांत हनवते उमाकांत गागलवाड, प्रकाश झुंजारे निरंकार कदम गुलाम शेख, विठ्ठल टोम्पे, संजय टोम्पे, राजू टोम्पे, रमेश टोम्पे, भीमराव हनवते, भुजंगराव हनवते, मधुकर हनवते, नामदेव भदरगे, आनंदा भदरगे, माधव भदरगे, निवृत्ती गायकवाड, आनंदा बाईवार, नागोराव हनवते, दत्ता किशन रोकडे, रावसाहेब हनवते, नागोराव जोंधळे, व्यंकटी वाघमारे या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्तम उर्फ सिद्धार्थ भुजंगराव हनवते यांनी केले तर या कार्यक्रमाचे आभार भीम जयंती चे अध्यक्ष अविनाश टोम्पे यांनी मानले.

# प्रतापराव विरोधी भूमिका कायमच

## डॉ. रविंद्र ढोकणे, भाजपा, जिल्हा उपाध्यक्ष, खामगाव

आधुनिक केसरी न्यूज



**जळगाव जा :** मा. उद्धव ठाकरे यांचे सरकार असताना प्रतापरावांनी मोदी सरकार व भाजप विरोधी भूमिका घेऊन अपशब्द वापरण्याचे काम केले. प्रतापरावांच्या मूक संमतीने कोरोना काळामध्ये मा. देवेंद्रजी फडणवीस यांचा तोंडात कोरोना जीवाणू कोंबण्याचे वक्तव्य सेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी केले.जळगाव जामोद मतदार संघाचे आमदार डॉ.संजय कुटे यांना अत्यंत हीन व खालच्या पातळीवर टीका करीत 50 मीटरच्या आत आल्यास पाय तोडल्याची धमकी दिली. बुलढाणा येथे आमदार कुटे यांच्या कारवर हल्ला केला तसेच आमदार कुटे सोबत असलेल्या जळगाव जामोद येथील कार्यकर्त्यावर गुन्हे दाखल केले.आमदार श्वेताताई महाले पाटील यांचे विषयी देखील अपशब्द काढण्याचे काम आमदार गायकवाड यांनी प्रतापरावांच्या मूकसंमतीने केले. तर आमचे भाजपचे जिल्हा निवडनुक प्रचार प्रमुख माजी आमदार विजयराजजी शिंदे यांना मारहाण करणे पर्यंत यांची मजल गेलेली आहे. हा सर्व प्रकार मा. मोदीची केंद्रात सत्तेत असताना होत आहे. म्हणून सर्व सामान्य भाजप कार्यकर्त्यामध्ये रोष आहे. व त्यांनी प्रतापरावाणा मतदान न करण्याचा मनोमन निर्णय घेतलेला आहे. मा. उद्धव ठाकरे साहेब यांचा सरकार मध्ये असताना मा. मोदी साहेब व भाजपा वर अश्लील भाषेमध्ये टीका केलेली आहे. त्यानंतर ते एकनाथ शिंदे सोबत गेल्यानंतर प्रतापरावांनी मा. उद्धव ठाकरे यांचेवर अश्लील शब्दात टीका करत असतात त्यामुळे ते आगामी काळात भाजपशी मतभेत झाल्यास भाजपालाही शिव्या घालणारच आहेत. तसेच प्रतापरावांचा भरवश्यावर सरकरा स्थापन करण्याची वेळ आली तर हे भाजपला कधी दांडी मारतील यांचा काही नेम नाही. त्यामुळे प्रतापरावांना मत म्हणजे स्वार्थाकरीता कुठेही उड्या मारणाऱ्या व सतत तळ्यात मळ्यात करणाऱ्या व्यक्तीला मत असल्यामुळे सर्व सामान्य कार्यकर्त्यांची स्वाभीमानासाठी व प्रतापरावाचा सुरु असलेल्या गुंडगिरीला आळा घालण्यासठी त्यांना पाडण्याचा निर्धार सर्व सामान्य निष्ठावंत भाजप कार्यकार्यांनी घेतलेला आहे. आमदार डॉ.संजय कुटे मध्यंतरी प्रतापराव निवडून येणार हि काळ्या दगडावरची रेघ आहे असे सांगितले. त्यांचे मत म्हणजे कार्यकर्त्यामध्ये उत्साह् निर्माण करण्यासाठी केलेला प्रयत्न आहे. मत्र वस्तुस्थितीचा विचार केला तर आपल्या असे लक्षात येईल कि, मध्ये ज्या काही निवडनुका झाल्या त्यामध्ये शिक्षक मतदार संघामध्ये श्री. धांडे भाजपचे उमेदवार होते व नेते मंडळी सध्या आहे तीच होती. तरीहि त्यांचा पराभव झाला तसेच श्री. रणजीत पाटील हे आमचे उमेदवार होते. त्यांचाही पराभव झाला. त्यावेळी तर शिंदे सेनेचे आमदार संजय गायकवड यानी आम्हाला विश्वासात घेतले नाही म्हणून श्री. रणजीत पाटील यांचा पराभव झाला अशा वल्गना श्री गायकवाड यांनी केल्या. आता श्री. प्रतापराव यांचा पराभव निष्टावंत भाजप कार्यकर्ते करणारच आहेत. ते प्रतापरावांचा वागणुकीमुळे व गुंडगिरी मुळे मात्र पराभव झाला कि, खापर भाजप वरच फोडणार असल्यामुळे स्वताचे ठेवायचे झाकून दुसऱ्याच पाहायच वाकून या प्रवुतील भाजप कार्यकर्ते ठेचणारच आहेत. तसेच मध्यंतरी दहा कृषी उत्पन्न समितीचा निवडनुकीत सात ठिकाणी महाविकास आघाडी तर फक्त तीन ठिकाणी युतीचा जागा आल्या. यावरून सध्या स्थितीतील महायुतीची राजकीय स्तिथी लक्षात येते. मराठा आरक्षणा संधर्भात मराठा समाजाची मागणी वेगळीच असताना न मागताही त्यांना दोन वेळा रद्द झालेले आरक्षण देऊन मराठा समाजाची फसवणूक करण्याचे काम यांनी केले. मात्र ओबीसी चा बाबतीत श्री. भुजबळ साहेबाची भूमिका मान्य करून सुद्धा त्यांना आई वरून शिव्या घालण्याचे काम आमदास संजय गायकवाड यांनी केलेले आहे. हा मराठा समाजाची सहानुभूती मिळवन्या साठी व ओबीसी सहित सर्व मागासलेल्या समूहावर दंडेल शाही करण्याचा प्रयत्न आहे. या सर्वावर कळस म्हणजे माननिय आमदास कुटे साहेब यांनी विधिमंडळ मध्ये ओबीसी ची बाजू लाऊन धरत असताना भाजपचा बारा सदस्यचे कायम स्वरूपी निलंबन करून त्यामध्ये जळगाव जामोद मतदार संघही येतो. त्या मतदार संघातील मतदारांचे लोकप्रतीनिधीव्त्व हिरांवण्याचा प्रकार आपल्या बुलढाणा जिह्ल्यातील सेनेचा दोन आमदारनी विधीमंडळातील ठरावाला पाठींबा देऊन तमाम जळगाव जामोद विधानसभा मतदार संघातील मतदार बांधवाना लोक प्रतिनिधी पासून वंचित ठेवण्याचे महान पाप केलेले आहे. जिल्ह्यातील सेनेचा आमदारांच्या या कृत्याला त्यांचे राजकीय गुरु प्रतापरावच जबाबदार असल्याकरणाने थोरले बाजीराव पेशेवे यांचा म्हणण्या प्रमाणे झाडाच्या बुंध्यावर घाव घातला कि फांद्या आपोआप खाली येतील हे जाणून कार्यकर्त्यांनी मनोमन प्रतापरावणा त्यांची जागा दाखविण्याचा निर्णय घेतला आहे.



धुळे : क्रांतीसूर्य तात्यासाहेब महात्मा ज्योतीराव फुले यांच्या पुतळ्याची विटंबना करणाऱ्यांवर कारवाई करा, अशी मागणी घेऊन ओबीसी आरक्षण बचाव आंदोलन व समस्त माळी समाज पंचमढी यांच्यातर्फे जिल्हाधिकारी कार्यालया बाहेर निदर्शने करण्यात आली व निवेदन देण्यात आले. या निवेदनात असे म्हटले आहे की यवतमाळ येथील महात्मा फुले चौक येथील महात्मा ज्योतीराव फुले यांच्या पुतळ्याच्या पाठीवर शाई फेकुन विटंबना करण्याचा केविलवाणा प्रयत्न अज्ञात समाजकंटकांकडून करण्यात आला आहे. आजही महात्मा फुले यांच्या विचार सरणीच्या समोर येऊन भिडण्याची ताकद सामाजिक तेढ निर्माण करु पाहणाऱ्यांमध्ये नाही. तुमच्या डोक्यातील जातीवादी किड अजुन गेलेली नाही असा टोला ह्या निवेदनाद्वारे केला आहे. क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीराव फुले यांच्या यवतमाळ येथील पुतळ्याची विटंबना करणाऱ्या समाज कंटकांना लवकरात लवकर अटक करुन कारवाई करण्यात यावी असे आवाहन ओबीसी आरक्षण बचाव आंदोलन व समस्त माळी समाज पंच मंडळीच्या वतीने करण्यात आली आहे.

## सप्तश्रृंग गडावर साडेपाच लाखाचे भेसळयुक्त गोडपदार्थ जप्त

आधुनिक केसरी न्यूज



**नाशिक :** चैत्रोत्सवानिमित्त कळवण तालुक्यातील सप्तश्रृंग गडावर खाद्यपदार्थांमध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या वतीने पेढा तसेच हलवा विक्रेत्यांकडून पाच लाख ८३ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सप्तश्रृंग गडावर चैत्रोत्सव सुरू आहे. यानिमित्ताने अन्न व औषध प्रशासन विभागाच्या वतीने भेसळयुक्त अन्नपदार्थांची विक्री होऊ नये, यासाठी कार्यवाही करण्यात आली. गडाच्या रोपवे संकुल परिसरात ग्राहकांची दिशाभूल करुन मावा पेढे, कंदी पेढे, मलाई पेढे, कलाकंद हे पदार्थ दुधापासून तयार केले असल्याचे भासवत पदार्थांमध्ये काही ठिकाणी भेसळ आढळली. मे. अभिजीत रमेश बोरे पेढा सेंटर या दुकानातून १२४ किलो, मयुरी प्रसाद पेढा सेंटरमधून ८९२ किलो, योगेश तिवारी यांच्या दुकानातून ५३ किलो, मे. श्री माँ भगवती पेढा सेंटर, अशाप्रकारे एकूण एक हजार ९४४ किलोचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यातील खाद्य पदार्थाचे नमुने ताब्यात घेत पुढील कार्यवाहीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले असून अन्य माल हा ग्रामपंचायतीच्या कचरा डेपोत नष्ट करण्यात आला आहे. अन्न व औषध प्रशासनाने केवळ यात्रोत्सवादरम्यान अशी कारवाई न करता कायम अशा प्रकारची तपासणी केली तरच, भेसळीला आळा बसेल, अशी प्रतिक्रिया भाविकांनी व्यक्त केली.

## पाच लाख नागरिकांची टँकरवर भिस्त

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात 'हर घर जल'सह विविध शासकीय योजनांचा जोरदार प्रचार सुरू असताना दुसरीकडे १० तालुक्यांतील ७८३ गावे व वाड्यातील सुमारे पाच लाख नागरिकांना टँकरने पाणी द्यावे लागत आहे. गावांची तहान भागविणे आणि टँकर भरण्यासाठी १३० विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले. २५६ टँकर दैनंदिन ५६२ फेऱ्यांमधून पिण्यासाठी पाणी उपलब्ध करीत आहे. एप्रिलच्या मध्यावर तापमानाने ४० अंशांचा टप्पा ओलांडला. उष्णतेच्या लाटेत पाणी टंचाईचे संकट भीषण स्वरुप धारण करीत आहे. नाशिक, दिंडोरीसह धुळे लोकसभा मतदार संघात प्रचाराने वेग घेतला आहे. तळपत्या उन्हात प्रत्यक्षात टंचाईचे बसणारे चटके आणि प्रचारात रंगवले जाणारे चित्र यातील विसंगती ठळकपणे दिसत आहे. मागील दोन आठवड्यात टंचाईग्रस्त गावे व वाड्यांची संख्या लक्षणीय विस्तारली. जिल्हा परिषदेच्या अहवालानुसार सध्या २४८ गावे आणि ५३५ वाड्या अशा एकूण ७८३ ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा सुरू आहे.

## जिल्ह्यातील धरणामध्ये जलसाठ्यात घट

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** एप्रिल महिन्यात उन्हाच्या झळासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे उन्हाळ्यात पावसाळ्यासारखी स्थिती निर्माण झाली. परंतु, अजूनही उन्हाळ्याचे दोन महिने शिल्लक असून नागपूर जिल्ह्यातील धरणातील जलसाठ्यात घट झाली आहे. जिल्ह्यातील लघु, मध्यम आणि मोठ्या धरणातील जलसाठ्यात गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी घट झाल्याचे दिसून येत आहे. तरीही अवकाळी पावसाची भर पडल्याने व पाणी वापर कमी झाल्याने मे आणि जूनमध्ये पाण्याचा तुटवडा भासण्याची शक्यता कमी असल्याचा सिंचन खात्याचा अंदाज आहे. नागपूर जिल्ह्यात १६ मोठे प्रकल्प आहेत. त्यामध्ये उपयुक्त जलसाठा २० एप्रिलपर्यंत १५०४.७८ दसलक्ष घनमीटर (दलघमी) एवढा होता. मध्यम प्रकल्प ४२ आहेत. त्यातील एकूण जलसाठा २७४.०८ दलघमी आहे. तर लघु प्रकल्प ३२५ असून त्यात एकूण उपयुक्त जलसाठा १९७.६७ दलघमी एवढा आहे. मोठ्या प्रकल्पातून विविध शहरांना पाणीपुरवठा केला जातो. तसेच शेतीसाठी पाण्याचा वापर केला जातो.



# नवमतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करा : स्वामी

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने नवमतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करावे तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मतदार जनजागृती उपक्रमात सहभागी करुन घ्यावे,असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी आज जिल्ह्यातील महाविद्यालयीन प्राचार्य यांना केले.

'युवा वर्ग साजरे करणार मतदान पर्व', या मध्यवर्ती विचारानुसार जिल्ह्यातील अधिकाधिक नवमतदार, विद्यार्थी- विद्यार्थिनी व त्यांच्या मार्फत त्यांच्या पालकांपर्यंत मतदार जनजागृतीविषयक उपक्रम पोहोचविणे व त्यांना मतदानासाठी आवाहन करणे याबाबत आज जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, प्रशासकीय प्रमुख, शिक्षण, उच्च शिक्षण व तंत्रशिक्षण विभागाचे प्रमुख अधिकारी यांची संयुक्त बैठक बोलावण्यात आली होती. स्मार्ट सिटी कार्यालयात ही बैठक पार पडली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, स्वीप नोडल अधिकारी सुदर्शन तुपे, स्वप्निल सरदार, उपायुक्त अंकूश पांढरे, शिक्षणाधिकारी मधुकर देशमुख, तंत्रशिक्षण विभागाचे सहसंचालक नागदिवे, उच्च शिक्षण सहसंचालक निंबाळकर, मनपा शिक्षणाधिकारी भारत तिनगोटे तसेच जिल्ह्यातील महाविद्यालयांचे प्राचार्य व प्रशासकीय प्रमुख आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, वयाची १८ वर्षे पूर्ण केलेले विद्यार्थी की, जे यंदाच्या निवडणूकीत प्रथमच मतदान करणार आहेत. ते आपल्या महाविद्यालयांचे विद्यार्थी आहेत. त्यांच्या मतदानाविषयी त्यांच्यात जागरुकता निर्माण करणे. तसेच महाविद्यालयातील एनएसएस व एनसीसी सारख्या विभागांमार्फत विद्यार्थ्यांना मतदार जनजागृती उपक्रमात सहभागी करुन घेणे, हे आवश्यक आहे. जिल्हाधिकारी स्वामी पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांमार्फत मतदार जनजागृतीचे अभिनव व उत्कृष्ट कार्य करणारे विद्यार्थी विद्यार्थिनी यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविणे असे उपक्रम राबविता येतील. त्यात महाविद्यालयांनी सहयोग द्यावा. सध्या परीक्षांचा कालावधी आहे. तो गृहित धरुन उपक्रम राबवावे. विद्यार्थ्यांच्या अभ्यासात व्यत्यय निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. प्राचर्य, प्राध्यापक हा एक उच्च सुसंस्कृत वर्ग असतो. आपणही आपल्या मार्फत आपल्या परिसरातील लोकांना मतदानाचे महत्त्व सांगून त्यांना मतदानाचे कर्तव्य पार पाडण्यासाठी प्रेरित करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांनी विविध समाजमाध्यमांमार्फत विद्यार्थ्यांना मतदार जागृती उपक्रमांत सहभागी करुन घेण्यासाठी स्थानिक पातळीवर नियोजन करावे. आपण करीत असलेल्या प्रयत्नांचे रुपांतर हे प्रत्यक्ष निष्कर्ष प्राप्त होण्यात झाले पाहिजे, त्यादृष्टीने नियोजन करावे, असे आवाहन केले.

## श्री गणेश मित्र मंडळाच्या वतीने जय श्रीरामच्या जयघोषात सुजय विखे पाटील यांचे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** पुण्यश्लोक अहिल्यानगर व्यापारी महासंघ व वंदे मातरम् युवा प्रतिष्ठान तसेच कापड बाजार श्री गणेश मित्र मंडळाच्याच्या वतीने व्यापारी महासंघाचे अध्यक्ष ईश्वर अशोक बोरा यांनी सुजय विखे पाटील यांचे उमेदवारी अर्ज भरताना काढलेल्या प्रचार फेरीचे जोरदार स्वागत केले. अध्यक्ष आदित्य गांधी, उपाध्यक्ष संभव काठेड, खजिनदार कुणाल नारंग, सह सचिव केतन मुथा, दीपक नवलानी, महावीर कांकरिया, प्रतीक बोगावत, चिंटू भाऊ खंडेलवाल, सौरभ भांडेकर, विक्रम नारंग, देवेंद्र भटेजा, अमित नवलानी, उद्योजक मुरलीसेठ ब्रीजलाल नवलानी, रमेश नवलानी, सुमित कुलकर्णी, सुमित गायकवाड, लाभेश तलरेजा, हेमंत रासने, कैलास नवलानी, पवन किथानी, मयुर कटारिया, ऋषी येवलेकर, जयकुमार रंगलानी, विनोद कराचीवाला, नरेश नवलानी, ललित कटारिया, गणेश गोयल आदी व्यापारी व मंडळाचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी त्यांच्या प्रचारात सक्रिय असलेले नगर शहराचे लाडके आमदार संग्राम भैय्या जगताप यांचे देखील स्वागत करत त्यांना प्रभू श्रीरामाची शाल उद्योजक दीपक नवलानी यांच्या हस्ते घालण्यात आली. त्याच प्रमाणे विजय सदाशिव ऑटी, सचिन कोतकर, धनंजय जाधव आदींचेही स्वागत व्यापारी महासंघाच्या वतीने करण्यात आले. प्रभू श्री रामांच्या नावाचे जयघोष करत त्यांच्या भजनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्व उपस्थित सभासदांनी व मंडळाच्या कार्यकर्त्यांनी आप आपल्या दुकानाच्या गॅलरीतून सर्व मान्यवर व रॅलीत सहभागी झालेल्यांवर फुलांची उधळण करत फटाक्यांची आतषबाजी करण्यात केली व सुजय दादा "तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है" असे नारे देत सुजय दादांना निवडणुकीच्या निमित्ताने शुभेच्छा देण्यात आल्या.






## इंजि.यश प्रमोद शहा यांचा आर्किटेक्ट इंजिनियर्स सर्व्हेअर्स असोसिएशनकडून सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** इंजि. यश प्रमोद शहा लहान वयात समाजासाठी खूप चांगले योगदान देत आहेत. यश शहा हे उच्चशिक्षित सिव्हिल इंजिनीअर असून बांधकाम व्यावसायिक आहेत.त्यांचे काम सांभाळताना सामाजिक कर्तव्याच्या भावनेने त्यासाठी वेळ काढून सामाजिक कार्यात हातभार लावणे ही फार मोठी गोष्ट आहे. इंजि.यश शहा यांच्या जैन अल्पसंख्यांक बांधवांसाठी, गोशाळांसाठी सेवा, साधुसंत गुरु महाराज विहारसाठी पोलीस संरक्षण व इतर सामाजिक मदतकार्यासाठी दिलेल्या सामाजिक योगदान कार्याची दखल घेऊन आज त्यांची राष्ट्रीय कार्याध्यक्ष -अखिल भारतीय जैन दिवाकर मंच, नवी दिल्ली तसेच उपाध्यक्ष जैन श्वेतांबर श्रावक गुजराती समाज, अहमदनगर या दोन्ही पदी निवड झाली आहे.

या निवडीबद्दल एसा च्या वतीने शहा यांचा सपत्नीक सत्कार जिल्हा टाऊन प्लॅनिंग डिपार्टमेंटचे प्रमुख मा.पंडित मॅडम, SRJ STEEL जिल्ह्याचे प्रमुख मॅनेजर व टीम, आर्च क्रांतीचे सुप्रसिद्ध आर्किटेक्ट मा.माळी सर, एसा चे अध्यक्ष कार्ले सर, सेक्रेटरी तांदळे सर, उपाध्यक्ष दहिफळेजी या सर्वांच्या हस्ते करण्यात आला. राष्ट्रीय स्तरावर निवड ही संस्थेसाठी अभिमानाची बाब आहे असे आवर्जून सेक्रेटरी यांनी यावेळी सांगितले. इंजिनीयर यश हे एसा चे संचालक म्हणून देखील कार्यरत आहेत. या बरोबरच अल्पसंख्यांक समिती उपप्रमुख गुजराती समाज महासंघ, सावेडी उपनगर व्यापारी असोसिएशन संचालक, समस्त महाजन आदि जीन ट्रस्ट कॉर्डिनेटर, भारत सरकार HAWR सदस्य - ॲनिमल वेल्फेअर बोर्ड अशा विविध क्षेत्रातील सामाजिक संस्थांवर पदाधिकारी नात्याने कार्यरत आहेत. सत्कार प्रसंगी अहमदनगर जिल्ह्यातील एसाचे दीडशेपेक्षा जास्त आर्किटेक्ट, इंजिनियर्स, सर्व्हेअर्स सभासद यावेळी उपस्थित होते. उपस्थित सर्वांनी इंजि.यश यांचे केलेल्या चांगल्या सामाजिक कार्याबद्दल विशेष कौतुक केले. शहा यांनी याप्रसंगी एसा संस्थेचे खूप खूप धन्यवाद देत आभार मानले. सत्कारामुळे सामाजिक जबाबदारी आणखी वाढल्याची भावना यावेळी त्यांनी व्यक्त केली.



## नेवासा बुद्रुकच्या दक्षिणमुखी मारुती मंदिरात पुष्पवृष्टी करून हनुमंतरायाचा जन्मोत्सव

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** संत श्री समर्थ रामदास स्वामींनी १६६९ साली स्थापित केलेल्या दक्षिणमुखी मारुती मंदिरामध्ये हनुमंतरायांचा जन्मोत्सव पुष्पवृष्टी करून व फटाक्यांची आतषबाजी करून साजरा करण्यात आला. यावेळी राम लक्ष्मण...जानकी जय बोला हनुमान की.. या जयघोषाने परिसर दुमदुमला होता.

दक्षिणमुखी मारुती मंदिर देवस्थानच्या वतीने हनुमान जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.हनुमान जयंतीच्या निमित्ताने पहाटेच्या सुमारास दक्षिणमुखी मारुतीच्या मूर्तीस दक्षिणमुखी मारुती मंदिर देवस्थानचे अध्यक्ष गंगाधर शिंदे व विश्वस्त अँड.वसंतराव नवले यांच्या हस्ते वेदमंत्राच्या जयघोषात अभिषेक घालण्यात आला. वेदशास्त्रसंपन्न आचार्य लालागुरू जोशी यांनी यावेळी झालेल्या धार्मिक कार्यक्रमाचे पौरोहित्य केले. यावेळी झालेल्या हनुमान जन्मोत्सव सोहळयाच्या प्रसंगी हभप कोंडीराम महाराज पेचे,रामायणाचार्य हभप नंदकिशोर महाराज खरात, हभप गहिनीनाथ महाराज आढाव, ह.भ.प. विजय महाराज पवार, गणेश महाराज दरंदले, देवस्थानचे अध्यक्ष गंगाधर शिंदे, उपाध्यक्ष किशोर गायकवाड, सचिव ॲड.वसंतराव नवले, विश्वस्त दादासाहेब कोकणे, विश्वस्त भानुदास रेडे,राजेंद्र मारकळी, धनंजय डहाळे, सौ.लताबाई बोरकर, शेषराव डौले, संभाजी बेंद्रे, सुनील डोहाळे, गोकुळराव जायगुडे, सखाराम महाराज टेलर,केशव डौले, पुंजाराम पेचे, संभाजी ठाणगे, पिंटूभाऊ बोरकर यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी झालेल्या हनुमान जन्मोत्सव सोहळयाच्या प्रसंगी नेवासा बुद्रुक येथील श्री संत गाडगेबाबा भजनी मंडळाने रामनामाचे भजने गाऊन उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. सियावर रामचंद्र की, पवन सूत हनुमान की जय असा जयघोष व पुष्पवृष्टी करत हनुमंतरायाचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. उपस्थित भाविकांना शिरा व लाडू प्रसादाचे वाटप भाविकांच्या वतीने करण्यात आले देवस्थानचे अध्यक्ष गंगाधर शिंदे यांनी उपस्थित भाविकांचे आभार मानले. हनुमान जन्मोत्सवाच्या निमित्ताने पहाटे पासून दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)


डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# संविधान 80 वेळा बदलणाऱ्या काँग्रेसचा भाजपा विरोधात अपप्रचार

## भाजपा राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांचा हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**गोवा :** गोव्यातल्या काँग्रेस उमेदवाराने गोव्यात भारतीय संविधान लागू करू नये, अशी मागणी केली आहे, तर कर्नाटकातील एका काँग्रेस नेत्याने अशीच मागणी काही दिवसा पूर्वी केली होती. यावरून काँग्रेसलाच संविधानाविषयी आदर नसल्याचे स्पष्ट झाले आहे, अशी टीका भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत केली. प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, भाजपा उत्तर भारतीय मोर्चाचे अध्यक्ष डॉ.संजय पाण्डेय, प्रवक्ते अतुल शाह यावेळी उपस्थित होते. काँग्रेस ने सत्ताकाळात संविधानात 80 वेळा बदल केले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपा यांच्यावर टीका करण्यासारखे काहीच उरले नसल्याने काँग्रेस नेते राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे हे संविधान बदलासाठी भाजपाला 400 पेक्षा अधिक जागा हव्या आहेत, असा अपप्रचार करत आहेत, असा हल्ला तावडे यांनी चढवला. मोदी सरकारच्या कार्यकाळात संविधान दिवस साजरा केला जाऊ लागला, भाजपाचे संकल्पपत्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनी प्रसिद्ध झाले. यावरून भारतीय जनता पार्टीचा डॉ.आंबेडकर आणि संविधानाबद्दलचा आदर स्पष्ट झाला आहे असेही तावडे यांनी सांगितले.
तावडे म्हणाले की, गोव्यातील काँग्रेस उमेदवाराने गोवा राज्याला भारतीय संविधान लागु करू नये अशी मागणी जाहीरपणे केली आहे. राहुल गांधी यांच्या अनुमतीनेच आपण ही मागणी करत आहोत असे या उमेदवाराने सांगितले आहे. कर्नाटकातील एका काँग्रेस नेत्याने असेच वक्तव्य केले होते, यावरून काँग्रेसला संविधानाचा आदर करण्याची इच्छा नाही हेच स्पष्ट झाले आहे.




यावेळी तावडे यांनी राज्यातील प्रचाराच्या घसरलेल्या पातळी बाबत चिंता व्यक्त केली. ते म्हणाले की, प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे, बाळासाहेब ठाकरे, विलासराव देशमुख, शरद पवार हे नेतेही परस्परांवर टीका करत असत. मात्र त्यावेळी प्रचाराची पातळी घसरत नव्हती. मोदी सरकारच्या गेल्या 10 वर्षांच्या कार्यकाळात महाराष्ट्राला भरभरून मिळाले आहे, असे स्पष्ट करत श्री.तावडे यांनी गेल्या 10 वर्षात महाराष्ट्राला केंद्राकडून काय मिळाले याचा हिशोब सादर केला. ते म्हणाले की 'युपीए' सरकारच्या तुलनेत केंद्राकडून महाराष्ट्राला मिळालेल्या अनुदानात 253 टक्क्यांनी वाढ झाली, करांच्या परताव्यापोटी मिळणाऱ्या रकमेत 33 टक्के वाढ झाली. 2020-2021 पासून 11 हजार 711 कोटी एवढे बिनव्याजी कर्ज मिळाले, राज्यात शहरी आणि ग्रामीण भागात 27 लाख घरे पंतप्रधान आवास योजनेखाली बांधली गेली. अशा अनेक गोष्टींचा विचार करून मतदार भाजपा आणि महायुतीला भरभरून मतदान करतील असा विश्वास श्री.तावडे यांनी व्यक्त केला.
श्री.तावडे म्हणाले की, महाराष्ट्रात आयुष्मान भारत योजनेचे 2.50 कोटी लाभार्थी आहेत, राज्यात जनधन योजनेत 3 कोटी 42 लाख खाती उघडली गेली. मुद्रा योजनेत महाराष्ट्रात 2 लाख 33 हजार कोटी एवढे कर्ज वाटप झाले, राज्यात 8 लाख विक्रेत्यांना स्वनिधी योजनेत कर्ज मिळाले. 75 लाख जणांच्या घरात जलजीवन योजनेद्वारे पाणी मिळाले.



# विद्यार्थ्यांचे औक्षण करुन दिला प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** केडगाव येथील मनपाच्या ओंकारनगर आयएसओ प्राथमिक शाळेत शाळा पूर्व तयारी अभियानांतर्गत मंगळवारी (२३ एप्रिल) मेळावा घेण्यात आला. नव्याने शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे औक्षण करुन स्वागत, तर शाळेतील पहिले पाऊल म्हणून पहिलीत नव्याने आलेल्या विद्यार्थ्यांच्या पायाचे ठसे उमटवून प्रवेश करण्यात आला.
यामप्रसंगी इनरव्हील क्लब ऑफ अहमदनगरच्या माजी अध्यक्षा नंदा यादव, पत्रकार अनिल हिवाळे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा प्रियंका लोळगे, उपाध्यक्षा दीपाली साळवे, सदस्या पल्लवी भुजबळ, संध्या तोडमल, कवित वाघमारे, दुर्गा घेवारे, पूनम बडे, मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी, सहशिक्षक शिवराज वाघमारे, पालक सदस्य व विद्यार्थी उपस्थित होते.
पत्रकार अनिल हिवाळे म्हणाले, अंगणवाडीतून इयत्ता पहिलीत येणाऱ्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, सामाजिक, मानसिक पातळीवर सर्वांगीण विकास करून जागतिक पातळीवर ते यशस्वी व्हावेत, आदर्श व जबाबदार नागरिक घडावेत, यासाठी हे शाळा पूर्व तयारी अभियान राबवण्यात येते. या शाळा पूर्व तयारी अभियानामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासाबरोबरच विविध विषयांचा पाया भक्कम होण्यास मदत होणार आहे. इनरव्हील क्लब ऑफ अहमदनगरच्या माजी अध्यक्षा नंदा यादव यांनीही विद्यार्थ्यांना शाळेत शिक्षण घेऊन शाळेचे नाव मोठे करण्याचे आवाहन करुन स्वच्छतेबाबत मार्गदर्शन केले.
विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकास, बौद्धिकविकास, भाषा विकास, सामाजिक व भावनिक विकास, गणन पूर्व तयारी याची माहिती देत पालकांना मार्गदर्शन शाळेचे मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी यांनी केले. या मेळाव्यात शारीरिक विकास, बौद्धिक विकास, सामाजिक व भावनिक विकास, भाषा विकास, गणन पूर्वतयारी हे स्टॉल ठेवण्यात आले होते. प्रत्येक स्टॉल वरून पहिली वर्गात प्रवेश घेतलेले विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करण्यात आले. विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून मेळाव्याची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी यांनी केले तर सहशिक्षक शिवराज वाघमारे यांनी आभार मानले.

# धर्म संकटात आल्यावर भगवान परमात्मा जन्माला येतोच: अमृतानंद महाराज कांकरिया

आधुनिक केसरी न्यूज



**नेवासा :** तालुक्यातील वाटापूर येथे हनुमान जयंतीचे औचित्य साधून आयोजित ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व रामायणाचार्य हभप अमृतानंद महाराज कांकरिया यांच्या श्रीराम कथा सोहळयाची काल्याच्या किर्तनाने दहीहंडी फोडून हनुमान जयंतीला सांगता करण्यात आली. धर्म संकटात आल्यावर भगवान परमात्मा हा जन्माला येतोच असे प्रतिपादन रामायणाचार्य हभप अमृतानंद महाराज कांकरिया यांनी यावेळी बोलताना केले. यावेळी झालेल्या काला किर्तन प्रसंगी बोलताना हभप कांकरिया महाराज यांनी भगवान श्रीकृष्ण परमात्म्याच्या बाललीलांचे वर्णन केले. धर्म जेव्हा संकटात असतो तेव्हा तेव्हा धर्मावरील आलेली ग्लानी दूर करण्यासाठी भगवान परमात्मा युगानुयुगे भूतलावर जन्म घेतो असे सांगून त्यांनी संत हे भूतलावरील साक्षात दैवते असून देवगडचे बाबा साक्षात देवाचे रूप असल्याचे सांगितले. संतांच्या संगतीत राहून परमार्थ फलद्रूप करा, धार्मिक वैभव वाढविण्यासाठी धार्मिक सोहळयात योगदान द्या असे आवाहन त्यांनी यावेळी बोलताना केले. यावेळी झालेल्या काल्याच्या किर्तन प्रसंगी देवगड भक्त मंडळाचे सेवेकरी हभप लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे, बदाम महाराज पठाडे, कुबेर महाराज जगधने, अगस्ती देवस्थान सेवेकरी भानुदास महाराज भिसे बाबा, गायनाचार्य शंकर महाराज तनपूरे, शिंगणापूर देवस्थानचे माजी विश्वस्त पंढरीनाथ शेटे, रावसाहेब शेटे, नाथभक्त दत्तू महाराज पवार, शिवाजी महाराज सरोदे यांच्यासह ग्रामस्थ, सोहळा कमिटीचे सर्व सदस्य, अहिल्या ग्रुपचे कार्यकर्ते, चैतन्य सिद्धनाथ तरुण मंडळ, भजनी मंडळ सेवेकरी महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. हनुमान जयंतीच्या निमित्ताने आयोजित पारायण व राम कथा सोहळयासाठी योगदान देणाऱ्या भाविकांचा हभप कांकरिया महाराजांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांचे सोहळा कमिटीच्या वतीने सीताराम बाचकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.




# नीता अंबानी यांनी घेतले साई समाधीचे दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** जगाला श्रध्दा व संबुरीचा संदेश देणाऱ्या साईबाबांच्या समाधी दर्शनासाठी धिरुभाई अंबानी इन्टरनॅशनल स्कूलच्या संस्थापक व चेअरमन तसेच उद्योजक श्रीमती निता अंबानी यांनी शिर्डी येथे येऊन मनोभावे दर्शन घेतले त्यावेळी त्यांनी मुंबई इंडियन टि शर्ट परिधान केलेला होता. त्या जवळपास २तास साई मंदिर परिसरात होत्या. यावेळी साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, मंदीर प्रमुख रमेश चौधरी, जनसंपर्क अधिकारी तुषार शेळके व संरक्षण अधिकारी रोहीदास माळी आदी उपस्थित होते. उद्योजक श्रीमती निता अंबानी यांनीश्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतल्यानंतर त्यांचा शाल व साई प्रतिमा देऊन साईबाबा संस्थानच्या वतीने सत्कार संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर व सौ. वंदना गाडीलकर यांच्या हस्ते करण्यात आला या प्रसंगी विविध मान्यवर उपस्थित होते निता अंबानी या या अगोदर देखील साईदर्शनासाठी काही दिवसांपूर्वी शिर्डी येथे आल्या साईंच्या दर्शनामुळे मोठी मनःशांती समाधान मिळते अशी धारणा त्याची आहे व त्या साईंच्या परमभक्त असल्याने नेहमीच शिर्डी येथे येत असतात

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# भव्य मिरवणुकीने चंद्रकांत खैरेंचा उमेदवारी अर्ज दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शिवसेना नेते, युवा सेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांच्या उपस्थितीत क्रांतीचौक येथून भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणूकीने जाऊन छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. जय भवानी-जय शिवाजी, शिवसेना जिंदाबाद, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा विजय असो, आदित्य ठाकरे तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है, महाविकास आघाडीचा विजय असो या घोषणांनी परिसर दणाणून सोडला. छत्रपती संभाजीनगर लोकसभा निवडणूकीसाठी महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी क्रांतीचौक येथून भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणूकीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह संचारला होता.
छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मिरवणूकीला सुरूवात झाली. हातात शिवसेना, कॉंग्रेस, राष्ट्रवादी, रिपाइं पक्षाचे झेंडे फडकावत आणि हातात पोस्टर आणि बॅनर्स घेऊन



कार्यकर्ते सहभागी झाले होते. चाळीसगाव येथील बॅण्ड पथक, ढोल ताशांच्या गजरात जय भवानी-जय शिवाजी, छत्रपती शिवाजी महाराज की जय, शिवसेना जिंदाबाद, महाविकास आघाडीचा विजय असो या घोषणांनी परिसर दणाणून सोडला. उघड्या वाहनात शिवसेना नेते, युवा सेनाप्रमुख आदित्य ठाकरे, शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, शिवसेना नेते, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, शिवसेना उपनेते आमदार सचिन आहिर, आमदार उदयसिंग राजपूत हे जनतेला अभिवादन करीत होते. क्रांतीचौकातून निघालेली ही मिरवणूक सिल्लेखाना चौक, पैठणगेट, टिळकपथ मार्ग, गुलमंडी, मच्छली खडक, पानदरीबा मार्गे संस्थान गणपती जवळ विसर्जीत करण्यात आली.
या प्रसंगी माजी आमदार किशोर पाटील, भाऊसाहेब पाटील चिकटगावकर, संजय वाघचौरे, जि. प. चे माजी अध्यक्ष रंगनाथ काळे, हरिश्चंद्र लघाने, डॉ. अण्णा शिंदे, लता पगारे, ॲड. देवयानी डोणगावकर, माजी महापौर नंदकुमार घोडेले, सुदाम सोनवणे, कला ओझा, महानगरप्रमुख राजू वैद्य, जिल्हाप्रमुख राजेंद्र राठोड, सहसंपर्कप्रमुख विजयराव साळवे, लोकसभा समन्वयक प्रदीपकुमार खोपडे, राज्य संघटक चेतन कांबळे, भाकासेचे संयुक्त चिटणीस प्रभाकर मते, शहरप्रमुख बाळासाहेब थोरात, विजय वाघचौरे, विश्वनाथ स्वामी, ज्ञानेश्वर डांगे, कॉंग्रेसचे जेष्ठ नेते प्रकाश मुगदिया, शहराध्यक्ष शेख युसूफ, भाऊसाहेब जगताप, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष पाडुरंग तांगडे, शहराध्यक्ष ख्वाजा शरफोद्दीन, मोतीलाल जगताप, सुभाष लोमटे, ॲड. अभय टाकसाळ, बुद्धीनाथ बराळ, रमेशभाई खंडागळे, मराठवाडा बहुजन विकास आघाडीचे रमेश गायकवाड, वै*लास गायकवाड, शेख इब्राहीम, ॲड. सय्यद अक्रम, जफर खान, किरण पाटील डोणगावकर, गंगापूर कारखान्याचे चेअरमन कृष्णा डोणगावकर, शिवसेना उपनेत्या, संपर्कप्रमुख ज्योती ठाकरे, संपर्क संघटक सुनीता आऊलवार, सहसंपर्क संघटक सुनीता देव, जिल्हा संघटक प्रतिभा जगताप, राखी परदेशी, कॉंग्रेसच्या महिला जिल्हाध्यक्षा दीक्षा पवार, शहराध्यक्षा दिपाली मिसाळ, राष्ट्रवादीच्या जिल्हाध्यक्षा छाया जंगले, शहराध्यक्षा मेहराज पटेल, विना खरे, आपचे जिल्हाध्यक्ष सुभाष निकम, सपाचे पै*जल शेख, निसार अहमद, ॲड. जितेंद्र देहाडे प्रशांत जगताप, प्राचार्य शेख सलीम, युवासेनेचे उपसचिव ऋषिकेश खैरे, सहसचिव ॲड. धर्मराज दानवे, जिल्हा युवाधिकारी हनुमान शिंदे, मच्छिंद्र देवकर, उमेश मोकासे, युवती सेनेच्या सानिका देवराज यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**गद्दार गाडणार ....मशाल पेटणार**
या मिरवणूकीत कार्यकर्त्यांच्या हातातील घोषवाक्य लिहिलेल्या पोस्टर्सने अनेकांचे लक्ष वेधून घेतले. गद्दार गाडणार ...मशाल पेटणार, विजय सत्याचा ... पराभव गद्दाराचा, अब की बार ...खैरे सरकार, दारू विकणारा गद्दार ? की, अन्नदान करणार खुद्दार, नको खोके, नको टक्के ..खैरे साहेब एकदम ओके, आमच ठरलय ...आपल्या अस्तित्वासाठी, हक्काच्या एकनिष्ठ माणसासाठी, चोरांनी नेलाय धनुष्यबाण ...मशाल आहे आपली शान, या घोषवाक्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.



# पत्रकारांची लेखणी निष्पक्ष असावी

## राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** येथे दैनिक माझा मराठवाडा या वृत्तपत्राचा प्रथम वर्धापन दिन दि.२१ एप्रिल रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या थाटामाटात उत्साहात संपन्न झाला. पत्रकारांनी आपल्या लेखणीचा वापर निपक्षपणे करावा जेणेकरून त्यांच्या लेखणीच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला न्याय मिळेल व पत्रकारांनी संघटित राहून आपल्या न्याय हक्का साठी एकत्रितपणे लढण्याची गरज असल्याचे मत प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक माझा मराठवाडा वृत्तपत्राचे भंडारा जिल्हा प्रतिनिधी संजीव भांबोरे यांनी दैनिक माझा मराठवाडा या वर्तमानपत्राच्या प्रथम वर्धापन दिनी मार्गदर्शन करताना सांगितले. दिनांक 21 एप्रिल 20 24 रोजी सिल्लोड शहरातील एमटीडीसी हॉटेल हॉल येथे दैनिक माझा मराठवाडा वर्तमानपत्राचा प्रथम वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी या वर्धापन दिनाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित दैनिक देशोन्नतीचे जेष्ठ पत्रकार सिल्लोड तालुका प्रतिनिधी संजय कुलकर्णी, गरुड झेपचे जेष्ठ संपादक जी. टी. वाघ, प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे, तरुण भारतचे तालुका प्रतिनिधी गजानन मरकड,जेष्ठ पत्रकार दत्तात्रय ढोरमारे, दैनिक माझा मराठवाडा वृत्तपत्राचे मुख्य संपादक दशरथ सुरडकर, निवासी संपादिका जयश्री सोनवणे, मराठवाड्याचे विभागीय संपादक गोकुळसिंग राजपूत छत्रपती सोयगाव संभाजीनगर, वृत्तसंपादक प्रविण तायडे, कार्यकारी संपादक संजय दांडगे, सहसंपादक जमील मिर्झा, पत्रकार कदीर पटेल, पत्रकार राहुल सपकाळे, पत्रकार अनिल भाले, पत्रकार योगेश शेळके, पत्रकार शेख अजीम, पत्रकार दादाराव अपार, पत्रकार भैय्यासाहेब सुरडकर, पत्रकार समशेर पठाण, तथागत सुरडकर (चित्रकार), समता ग्रामीण विकास प्रतिष्ठानचे सचिव शोभा सुरडकर, शेख अकील, सुधाकर शिंगारे, ज्योती राजपूत, उत्तम इंगळे व महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# सप्तशृंगी ट्रस्टला चैत्र पौर्णिमेचा पडला विसर

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील पहुर येथील जय सप्तशृंगी माता ट्रस्टला चैत्र नवरात्री पौर्णिमेचा पुर्णतः विसर पडला असून मंदिर नसताना 'क' वर्ग दर्जा प्राप्त करून केवळ शासकीय निधी लाटण्यासाठी ट्रस्टचे प्रयत्न सुरू आहेत. यामुळे भाविकांच्या धार्मिक भावनांशी क्रुर चेष्टा होत असून प्रशासनाची दिशाभूल होत आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, पहूर - कसबे येथे गावाच्या प्रवेश द्वारा पाशी वाघूर नदीच्या तिरी जय सप्तशृंगी मॉ निवासिनी ट्रस्ट रजि नं ए ९८३ आहे . ग्राम पंचायत मध्ये या ट्रस्टच्या नावे नमुना नं ८ ला नोंद आहे. मात्र या जागेवर कोणतेही मंदिर अस्तित्वात नाही. परंतू , प्रशासनाला प्रस्ताव सादर करताना ट्रस्टने दिशाभूल करून जय सप्तश्रृंगी मातेचे मंदिर असल्याचे दाखविले आहे. येथे दरवर्षी चैत्र नवरात्री आणि अश्विन नवरात्री निमित्त मोठ्या संख्येने भाविक येतात अशीही माहिती दिली आहे. मात्र मंदिरच अस्तित्वात नसताना हे भाविक आले कोठे ? ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत 'क ' वर्ग मिळाला कसा? कोणत्या अधिकाऱ्यांना हाताशी धरून बनावट प्रमाणपत्रे मिळाविली? असा प्रश्न संतप्त भाविकांना पडत आहे. आज रोजी गावाच्या प्रवेशद्वारा पाशी सप्तश्रृंगी मातेचे कोणतेही मंदिर अस्तित्वात नाही. तरीही मंदिरा साठी सभामंडप उभारणीच्या नावाखाली केवळ शासकीय निधी हडपण्यासाठी ट्रस्टचे प्रयत्न सुरू असून शासनाने या ट्रस्टला कोणताही निधी वितरीत करू नये अशी मागणी जोर धरत आहे.



# दोन वर्षांत गृहनिर्माण खात्यात जे काही घडले त्याची मुख्यमंत्र्यांमार्फत चौकशी करा

## सुनील तटकरेंनी आ. भरत गोगावलेंना केली विनंती

आधुनिक केसरी न्यूज

**माणगाव :** बरं झालं... जयंत पाटील तुम्ही शरद पवारांना इथे आणलात. एका छोट्याशा गावामध्ये राष्ट्रीय नेतृत्वाला आणलंत आणि आमची ताकद किती आहे हे तुम्हाला मान्य करावं लागले आहे असा जोरदार टोला राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि रायगड लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार खा. सुनिल तटकरे यांनी शेकापचे नेते जयंत पाटील यांना लगावला.
म्हसळा, श्रीवर्धन येथे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अल्पसंख्याक मेळावे झाल्यानंतर माणगाव तालुक्यातील मोर्बा या गावी रात्री महायुतीचा अल्पसंख्याक मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. माझ्या प्रचाराला राष्ट्रीय पातळीवरील नेता अजून आणला नाही. माझी महायुती भक्कम आहे. पण तुम्हाला पवारसाहेबांची आठवण आली अशी उपरोधिक टिका सुनिल तटकरे यांनी केली. जयंत पाटील तुमचं भाषण मी थोडंसं ऐकलं. तुम्ही, जितेंद्र आव्हाड असतील या जगात खोटे बोलणारे कोण असतील तर हे दोघेजण आहेत असा थेट आरोप सुनिल तटकरे यांनी भरसभेत केला. तुम्ही शेकापचे प्रदेश सरचिटणीस झालात आणि १९५२ पासून या जिल्हयात लोकसभेच्या निवडणुका झाल्या तिथपासून कॉंग्रेस आणि तुमच्यात लढत झाली. तुम्ही नेतृत्व घेतलात आणि या जिल्हयातून शेकाप हद्दपार झाला. २००९ मध्ये शेकाप निवडणूकीत गेलात आणि तुम्ही शिवसेनेची लाचारी करत गेलात तुम्ही उमेदवारांना पाठिंबा दिलात. रायगड आणि मावळ मतदारसंघात चार आमदारांची बेगडी तुम्ही शिवसेनेच्या पदरात पाडलीत. म्हणून तुम्हाला विधानसभेत यश मिळाले याची आठवण सुनिल तटकरे यांनी करुन दिली. त्या काळात बॅरिस्टर अंतुले यांचा पराभव झाला. बॅरिस्टर अंतुलेंचा फोटो लावण्याचा अधिकार तुम्हाला कुणालाच नाही. आयुष्यभर अंतुले यांचा द्वेष करत या रायगड जिल्हयात आलात पण जयंत पाटील तुम्ही अंतुले यांच्या कृपेमुळे त्याठिकाणी राहिलात हे तुम्ही विसरता कामा नये. अंतुले मुख्यमंत्री असताना त्यांनी जरा जरी नजर दाखवली असती तर शेकापचं अस्तित्व १९८० साली संपुष्टात आले असते. मनाचा दिलदारपणा अंतुले दाखवला पण त्याच अंतुले विरोधात तुम्ही काय काय बोलत आलात ही करतूतही सुनिल तटकरे यांनी यावेळी सांगितली.
जितेंद्र आव्हाड तुम्ही बोललात की, माझ्या मुलीला जयंत पाटील यांनी जिल्हा परिषद अध्यक्ष केले. त्यात शरद पवार यांचा सहभाग होता अत्यंत खोटं बोललात... याच मोर्बाच्या भूमीत सांगतोय २०१४ मध्ये माझा २१०० मताने पराभव झाला. त्यानंतर स्वर्गीय मिनाक्षीताई पाटील, विवेक पाटील सुनिल तटकरेंकडे आले मला त्यांनी सांगितले की, आम्हाला युती करायची आहे अडीच वर्षांनी जिल्हा परिषदेमध्ये सत्तांतर होणार होते. पण त्यावेळी २०१२ मध्ये शेकापने शिवसेनेसोबत युती केली. म्हणून शेकाप जिल्हयात जिल्हा परिषदेमध्ये दिसला नाहीतर तो दिसू शकला नसता. तुम्ही जिल्हा परिषदेत पदाधिकारी झालात मी थोडसं दुर्लक्ष केले. आज जितेंद्र आव्हाड सांगत आहेत पवारसाहेबांनी सांगितले पण ही सगळी मंडळी नागपूरला मला भेटायला आली मग ठरलं की ज्यांच्या जागा जास्त येतील त्याच्यापेक्षा पहिली जागा, पहिलं अध्यक्ष पद हे राष्ट्रवादीला दिले जाईल. दुसरं अध्यक्ष पद शेकापला ठरले होते. खोटेपणाने किती वर्षे जगणार आहात असा रोखठोक सवाल सुनिल तटकरे यांनी केला.
सुनिल तटकरे आणि जयंत पाटील यांचं संस्थान खालसा केल्याशिवाय अनंत गीते रायगडमधून जाणार नाही. संस्थान कुणाची खालसा झाली. ज्याचं संस्थान खालसा झालं नाही त्यांच्या पायाला हात लावावा लागला अनंत गीते... राजकारणात तुमचा पराजय झाला सुनिल तटकरेंचा झाला नाही याची आठवण सुनिल तटकरे यांनी करून दिली.




# आयडीए बुलढाणातर्फे दंत तपासणी शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** स्थानिक तोमई इंग्लिश स्कूल बुलढाणा येथे मंगळवार 23 एप्रिल रोजी इंडियन डेंटल असोसिएशन बुलढाणा तर्फे दंतचिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये जवळपास 300 शालेय विद्यार्थ्यांची दंत तपासणी व आवश्यक उपचार करण्यात आला. यावेळी आयडीए बुलढाणा च्या वतीने अध्यक्ष डॉक्टर शरद जुमडे व टीम यांनी आवश्यक ते सहकार्य केले. यावेळी दातांच्या तपासणी शिवाय विद्यार्थ्यांना मौखिक आरोग्य कसे राखावे दैनंदिन रित्या दोन वेळेस ब्रश कसा करावा याबद्दल सखोल मार्गदर्शन करण्यात आले विद्यार्थ्यांमध्ये रुची वाढावी यासाठी एक कार्टून रंग भरण्यासाठी तसेच दातांच्या निगा राखण्याविषयी विविध सूचना असलेले पत्रक वाटप करण्यात आले.
आय.डी.ए. बुलढाणाच्या वतीने डॉ. सचिन किनगे, डॉ. नीता जतकर डॉ. संजय गवळी डॉक्टर वृषाली गवळी डॉ. साकेत सदावर्ते डॉक्टर नितीन वाघ यांनी विद्यार्थ्यांची तपासणी केली. तोमोई इंग्लिश स्कूल बुलढाणा
मुख्याध्यापक अजित जवंजाळ, गिरीश भोसले, रावसाहेब गुंजकर, गोपाल राजगुरू तसेच सर्व शिक्षक वृंद. इत्यादीचे सहकार्य लाभले असल्याची माहिती इंडियन डेंटल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. शरद जुमडे यांनी बोलताना दिली.

# नांदेड लोकसभा मतदारसंघात कोण बाजी मारणार ?

आधुनिक केसरी

**नांदेड लोकसभा मतदार संघात दुसऱ्या टप्प्यात मतदान होत आहे. जिल्ह्याच्या राजकारणात दोन नेत्यांचे 'साप मुंगसाचे' नाते होते. ते पूर्व काँग्रेस पक्षाचे नेते अशोक चव्हाण व भाजपाचे विद्यमान खासदार प्रताप पाटील चिखलीकर. पण आता चव्हाण हे भाजपात आल्याने जिल्ह्यात भाजपाला बळ मिळाले आहे व चिखलीकरांना चांगला साथ मिळाली आहे. चव्हाण भाजपात गेल्याने काँग्रेसचे पार कबरडे मोडले आहे. भाजपाचे चिखलीकर व तर काँग्रेसचे वसंतराव चव्हाण यांच्यात सरळ सामना होत आहे. पण जातीयता व आरक्षणावरुन भाजलापा धोका होवू शकतो! पण दोन धुरंधर नेते भाजपा यश मिळवून देणारे आहेत!**

नांदेड लोकसभा मतदार संघ १९५२ पासून काँग्रेस गड राहिला आहे. १९५२ मध्ये काँग्रेस दोन प्रतिनिधी खुल्या वर्गातून शंकरराव टेळकीकर व राखीव गटातून देवराव कांबळे निवडून आले. पुन्हा १९५७ मध्ये काँग्रेसचे देवराव कांबळे, हरिराव सोनुले हे एस.सी.एफ.तर्फे निवडून आले. १९६२ मध्ये नांदेड मतदार संघात काँग्रेसने उमेदवार तुळशीराम जाधव तर शाहीर जंगम स्वामी रि.प.पक्षातर्फे लढत झाली. काँग्रेस पराभूत करण्यासाठी शे.का.पक्ष इतर विरोधी पक्षांनी ताकद उभी केली होती. पण काँग्रेसबद्दल सहानुभूती होती.यात जाधव यांना मिळाली व सहज निवडून आले!त्यावेळेस शाहीर जंगम स्वामींनी यांनी तर 'देणे ना घेणे 'कंदील लावून येणे' असा



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

काँग्रसबद्दल शब्द प्रयोग केला होता. नांदेड नगरपालिकेचे नगराध्यक्ष व्यंकटराव तरोडेकर यांना उभे केले. काँग्रेसने १९६७ व १९७१ या दोन लोकसभा निवडणुकीत व्यंकतराव तरोडेकर निवडुन आले.काँग्रेसचे खा. तरोडेकर यांना मौनी खासदार म्हंटले जात होते. कारण त्यांनी लोकसभेत कधीच तोंड उघडले नाहीअशी टीका केली होती.नंतर तरोडेकर यांनी तर रिप. पक्षाचे यशवंतराव आठवले व डॉ. बाबासाहेबांचे आंबेडकरांचे पूत्र भैय्यासाहेब आंबेडकर हत्ती चिन्ह घेवून उभे होते. या दोघांचाही पराभव केला.१९८७ मध्ये अशोक चव्हाण यांनी नातू प्रकाश आंबेडकरांचा पराभव केला. काँग्रेसने डॉ. आंबेडकरांचे पूत्र नातू यांचा राजकीय सन्मान केला नाही.उलटभाजपा व हिंदुत्ववादी संघटनानी आंबेडकरांच्या बाजूने उभे राहिले होते.. हे प्रकाश आंबेडकर विसरले आहेतआता काँग्रेसचा ऐवजी भाजपाचा बदला घेण्याची भाषा करत आहेत! याचे आश्चर्य वाटते! १९७७ मध्ये काँग्रेसने व चव्हाण कुटुंबांनी गो.रा,म्हैसेकर यांना तोफेला उभे केले. कारण आणीबाणीमुळे काँग्रेस विरोधी लाट होती.तर विरोधी पक्षाने शे.का.पक्षाचे ज्येष्ठ नेते केशवराव धोंडगे एकमेव उमेदवार दिला. त्यात धोंडगे निवडून आले! जिल्ह्यात काँग्रेसला पराभवाचा पहिला धक्का बसला. १९८० मध्ये काँग्रेसचे जेष्ठ नेते शंकरराव चव्हाण यांचे विरोधात





विरोधी पक्षांनी एकच उमेदवार उभा म्हणून धोंडगे यांना पुन्हा उभे राहण्याची विनंती केली. तेव्हा महाराष्ट्रात मराठवाड्यातून चव्हाण यांचे नेतृत्वाला शह देण्यासाठी पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांनी पाठबळ दिले होते. चव्हाणांचे उजवे हात म्हणणारे नेते श्यामराव कदम यांनी चव्हाण यांचे विरोधात बंड करुन 'राजसंन्यास' घेण्याची प्रतिज्ञा केली होती. तेव्हा 'मोठ्या झाडाखाली छोटे झाड वाढत' नाही, अशी टीका चव्हाण नेतृत्वावर झाली. या निवडणुकीत चव्हाण पराभूत होतील, अशी बीबीसी बातमी दिली होती. ती खोटी ठरली! चव्हाण विजयी झाले! ते पुढे केंद्रात मंत्री झाले! १९८४ पशिश्चम महाराष्ट्र विरुध्द मराठवाडा असा सामना झाला. नेते शरद पवार यांनी चव्हाण यांचे विरोधात त्यांचे कट्टर समर्थक कमलकिशोर कदम यांना उभे केले! पवारांनी मराठवाड्यातील नेतृत्वाला म्हणजे चव्हाणांना शह देण्यासाठी कदम यांनी रसद पुरविली होती. पण कदम यांचा पराभव झाला! चव्हाण दुसऱ्यांदा लोकसभेवर निवडून गेले. तर १९८७ च्या पोट निवडणुकीत अशोक चव्हाण विरोधात प्रकाश आंबेडकर अशी लढत राज्यात गाजली. सर्व विरोधी पक्ष आंबेडकरांना साथ दिली. पण यावेळी दलित व विरोधात सवर्ण असा प्रचार झाला काँग्रसने यश मिळविले! चव्हाण विजयी झाले तर आंबेडकरांचा पराभूत झाला. या घटनेनंतर नंतर आंबेडकरांनी या मतदारसंघाकडे कायमची पाठ दाखविली. पण १९८९ मध्ये राष्ट्रीय पातळीवर राजकीय हवाच बदलली! मतदारात काँग्रेस विरोधात संतापाची लाट होती राजकारणात कोरी पाटी असलेले डॉ. व्यंकटेश काब्दे यांना अशोक चव्हाण यांच्या विरोधात उभे केले गेले! तसेच चव्हाण यांच्या विरोधात नकारात्मक मतदान झाले! यात चव्हाण यांना पराभवाचा पहिला धक्का बसला डॉ.काब्दे विजयी झाले.तरी चव्हाण यांनी पक्षाची ताकद वाढविली!१९९१ मध्ये काँग्रेसचे श्रीमती सूर्यकांता पाटील यांचे विरोधात शिवसेनेचे डॉ. डी.आर. देशमुखांना उभे केले. हिदुंत्वाच्या प्रचाराचा मतदारावर प्रभाव पडला नाही. शिवसेनेचा पराभव झाला व काँग्रेसच्या श्रीमती पाटील पहिल्या महिला खासदार निवडून आल्या! त्यानंतर १९९६ १९९८ व ११९९ या तीन लोकसभा निवडणुकीत डॉ. धनाजीराव देशमुख यांना तर काँग्रेसने उमेदवार गंगाधरराव कुटुंरकर यांना एकदा व दोन वेळेस भास्करराव खतगावकरांना उमेदवारी दिली. या तिन्ही निवडणुकीत भाजपाला विजय मिळवता आला नाही. नांदेड जिल्ह्यात भाजपा कमजोर असताना डॉ. देशमुख यांनी धाडसकेले त्या पक्षाला त्यांची किंमत नाही. ताज भाजपाने त्यांना वाऱ्यावर सोडले. तर जनसंघाचे काम करणारे गंजेवार यांचा विसर भाजपाला विसर पडला .२००४ मध्ये दोन पाटील आमने सामने आले! यात भाजपाचे डी. बी. पाटील यांनी काँग्रसचे भास्करराव खतगावकर यांना पराभव केला. जिल्ह्यात काँग्रेसला पराभूत करु शकतो, असा आत्मविश्वास निर्माण झाला. पण २००९ मध्ये काँग्रेसचे खतगावकरांनी भाजपाचे संभाजी पवार यांचा पराभूत केले. खतगावकर तीन वेळेस लोकसभेवर निवडुन आले तरी राजकीय इच्छा संपलेली नाही. ते आता कुटुबांसाठी राजकीय उड्या मारत आहेत! २०१४ देशात मोदी व भाजपाची लाट असताना काँग्रेसचे अशोक चव्हाण यांनी भाजपाचे उमेदवार डी.बी. पाटील यांचा पराभव केला. काँग्रेसने भाजपा उमेदवाराल मॅनेज केले, हा सूर काढला गेला, किमान चव्हाणांच्या विजयामुळे महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाचे नाक कापले गेले नाही.



२०१४ च्या निवडणुकीत चव्हाण कट्टर विरोधक म्हणून भाजपाने प्रताप पाटील चिखलीकर उमेवारी दिली. राजकारणतही 'काट्याने काटा निघतो, तेथे तलवारीची गरज नसते! ती खेळी भाजपाने खेळली!चव्हाण परिवाराने व काँग्रसने विद्यमान खासदार खतगावकरांना उमेदवारी नाकारली.स्वतः नेते अशोक चव्हाण लढतीसाठी उभे राहिले! चव्हाणांनी जिल्ह्यात ताकद असताना काँग्रेसला नाकारले, यात चव्हाणांचा पराभव झाला.चव्हाणासाती हा पराभव राजकीय भवितव्याला धक्का देणारा ठरला! अशोक चव्हाण यांनी नांदेड जिल्ह्यात काँग्रेस पक्ष वाढविला! नांदेड महापालिका निवडणुकीत भाजपा राज्य नेतृत्वाने शक्ती व पैसा मोठ्या प्रमाणात खर्च केला! पण महापालिकेतही काँग्रेसला बहुमत मिळवून दिले. नगरपालिका! पंचायत समिती, जिल्हा परिषद काँग्रेसच्या ताब्यात दिल्या नवखे काँग्रेसमधले हंबर्डे! अंतापूरकर आमदार केले. जर काँग्रेसने चव्हाण भरपूर दिले! तसे चव्हाणांनी पक्षाला तितेकचे दिले!
पण राष्ट्रीय पातळीवर काँग्रेसकडून साथ मिळत नव्हती.त्यांचासन्मानाने वागले जात नव्हते! आदर्श प्रकरणात ते एकाकी लढले!गांधी परिवारांनी त्यांचा राजीनामा घेतला. चव्हाण हे राज्याचे नेतृत्व करत असताना त्यांनी काँग्रेसला अधिक जागा जिंकून दिल्या! पण काँग्रसने त्यांना संधी दिली नाही. काँग्रेस पक्षात ज्यांनी शाळेत मॉनिटरची निवडणूक लढविली नाही, तो काँग्रेस पक्ष चालवित आहे. काँग्रेस पक्ष आपल्या धोरणापासून भटकत चालल आहे! सनातन धर्म विरोधी भूमिका घेवू लागला आहे. काँग्रेसच्याजी-२३ नेत्यांनीनाराजीचे पत्र दिले होते.त्यांना पक्षाने बाहेरचा रस्ता दाखविला. ज्येष्ठ नेते गुलाबनबी आझाद, कपील सिब्बल, ज्योतिराज सिंधिया! आचार्य प्रमोद कृष्णन, काँग्रेस दोन प्रवक्ते रोहण गुप्ता, गौरव वल्लभ तर राज्यात मिलिंद देवरा व संजय निरुपन या सर्वांनी ईडी, सी.बी.आय.च्या दवाबाखाली पक्ष सोडला काय? अशोक चव्हाण यांन ईडी व सी.बी. आय.ची नोटीस दिली गेलेली नाही. यात त्यांना न्यायालयाने दोषी ठरविले नाही! काँग्रेस व भाजपा याचा निर्णय देणार काय? इडी आघाडीत नॅशनल हेराल्ड! चारा, दारू खाण घाटोळ्यातील नेते कसे काय चालतात? नांदेडातही अनेक बडे नेते राष्ट्रवादीतून भाजपा गेले. तेव्हा ओरड का झाली नाही. पण चव्हाण यांना राजकीय भूमिका बदली तर पोट का दुखावे दिशेने जात आहे? प्रत्येकाला आत्मसन्मान असतो! तो जर चव्हाणांना मिळत नसेल तर काँग्रेस फक्षात का राहावे? चव्हाणांच्या जीवावर उड्या मारणारे त्यांचे मावळे संधीसाधू आहेत, हे त्यांना कळाले असेल! चव्हाण नीती युज अँन्ड थ्रोची आहे. ती बदलली पाहिजे. आज चव्हाणांना मराठा समाजातून लक्ष्य केले जात आहे, ते चुकीचे आहे. २०२४ मध्ये भाजपाचे प्रताप पाटील चिखलीकर विरोधात काँग्रेसचे वसंतराव चव्हाण यांचेत लढत होत आहे. या दोघातच सरळ लढत होत आहे. यावेळी निवडणुकीत जात आणि आरक्षणाच्या नावावर हिंदुमतांची विभाजन व्हावे, अशी खेळी काँग्रेस खेळत आहे.त्याचेकडे धोरण हा मुद्दा नाही. यामुळे भाजपाला फटका बसू शकतो! वंचितचा उमेदवार भोसीकर यांचकडे दलित मुस्लिम वोट अधिक वळली तर काँग्रेसला फटका बसतो!आपण अंदाज बांधू शकतो. शेवटी मतदाराचा हा मतपेटीपर्यंत निर्णय बदलत असतो. शेवटी लोकशाहीत त्यांचा कौल महत्वाचा आहे. मुस्लिम मतदाराची भूमिका महत्वाची आहे. चिखलीकर व चव्हाण या धुरंधर नेत्यांची परीक्षा आहे, ते नापास होणारे नेते नाहीत. ते दोन्ही नेते भाजपा निश्चित विजय मिळवून देतील, याची खात्री वाटते.

# शेतकऱ्यांनो आता बसा बोंबलत : गोटे

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** भारतीय जनता पक्षाच्या केंद्रातील सरकारने आपल्या देशातील कडधान्य उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पादनाचे भाव पाडण्यासाठी कॅनडा, रशिया, ऑस्ट्रेलिया, मॅनमार, आफ्रिका देश, ब्राझील, अर्जेटींना या देशामधून तूर, पिवळा वाटाणा, उडीद, मूग इत्यादी कडधान्यांची ४५ लाख टन इतकी आयात केली. निवडणुकीच्या वर्षात शेतीमालाचे भाव वाढून महागाई वाढल्याचे कारण होवून शहरातील मतदार आपल्या विरूध्द जावू नये. यासाठी आपल्याच देशातील शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे कारस्थान उधडे पडले आहे. सोयाबीन, तूर, हरभरा इत्यादी शेतीमालाच्या वाढत्या भावाचा फायदा परदेशातील शेतकऱ्यांना श्रीमंत करण्यासाठी व्हावा. आपल्या मर्जीतील उद्योगपतींना लाभ व्हावा यासाठी केलेले कारस्थान समजून घ्यावे असे आवाहन लोकसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार अनिल अण्णांनी केले आहे. आपल्या पत्रात विस्तृत माहिती देतांना नमूद केले आहे की, सरकारच्या कडधान्य आयातीच्या धोरणातील धरसोडी वृत्तीमुळे कडधान्याचे उत्पादन क्षेत्र गेल्या एका वर्षात १४ ते १६ टक्के कमी झाले आहे. कडधान्याचे मागील पाच वर्षातील उत्पादन २३० लाख टन २०१९-२० उत्पादनास बरे भाव मिळाल्याने २५४ लाख टन २०२०-२१ मध्ये बाजारातील सतत वाढणाऱ्या भावामुळे २७३ लाख टन उत्पादन २०२१-२२ मध्ये झाले होते. पण नंतर सतत बाजारभाव पाडल्याने २६० टन इतके उत्पादन २०२२-२३ मध्ये झाले तर, सरकारच्या धोरणातील लहरी निर्णयामुळे २३४ लाख टन उत्पादना इतके खाली आले आहे.
२०२२-२३ या वर्षात २४.५ लाख टन कडधान्याची आयात केली आहे. निवडणुकीच्या वर्षात शहरी ग्राहकांना खूष करण्यासाठी आयात धोरणात बदल करून दुप्पटीने म्हणजे ४५ लाख टन अंदाजे ३२ हजार कोटी रूपयांची कडधान्याची आयात केली आहे. एवढेच नव्हे तर, पुढील वर्षी मार्च २०२५ पर्यंत आयात शुल्क माफ केले आहे. एका बाजूला कांद्याला निर्यात बंदी करून कांदा उत्पादक शेतकऱ्यांची वाट लावली तर, दुसऱ्या बाजूला कडधान्याची आयात करून देशातील शेतीमालाचे भाव पाडले असे शेतकरी विरोधी तसेच शेतकऱ्यांना अक्षरशः देशोधडीला लावण्याचे कट कारस्थान आत उघडे पडले आहे.
आयात शुल्क माफ केल्यामुळे व ज्यादा दराने खरेदी होव असल्याने परदेशातील शेतकरी श्रीमंत होत आहेत. मागील वर्षी टोमॅटोचे दर दोनशे रूपया पर्यंत जाताच नेपाळ मधून द लाख टन टोमॅटोची आयात करून टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांची अवस्था 'घ का ना घाटका' अशी करून टाकली होती. कांदा निर्यात बंदी केली नसती त कांद्याला ५ ते ६ हजार रूपये क्वींटल इतका भाव मिळाला असता हे निश्चि शेतकऱ्यांनी शेतकरी विरोधी या धोरणाचा शांत डोक्याने विचार करावा अ आवाहन पत्रकात शेवटी केले आहे. असे पत्रक लोकसंग्रामचे जिल्हाध्यक्ष प्रशांत भदाणे व लोकसभा मतदारसंघ प्रमुख विजय वाघ यांनी आज प्रसिध्दीस दिले आहे.

# सारेच संत स्वानंद साम्राज्याचे चक्रवर्ती सम्राट

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** "साधता संवाद" श्री ज्ञानेश्वरी वाचन उपक्रमांतर्गत श्री ज्ञानेश्वरी ग्रंथाचे मासिक पारायण आयोजित करण्यात आले होते. प्रा. ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी) व त्यांचे सर्व सहकारी यांच्या वतीने ज्ञानेश्वरीच्या रोज तीनशे ओव्या वाचण्यचे वाचकाला आव्हान करण्यात आले होते. या उपक्रमात जवळपास दीडशे वाचकांनी उत्सुफूर्तपणे सहभाग घेऊन उदंड प्रतिसाद दिला. या श्रीज्ञानेश्वरी ग्रंथ पारायण सोहळ्याचा समाप्ती समारोह सिडको एन-४ येथील सुप्रसिध्द विधिज्ञ अॅड.अविनाश बोरूळकर यांच्या निवासस्थानी मोठ्या उत्साहात पार पडला. त्यांच्या मातोश्री श्रीमती प्रतिभा बोरूळकर (वय वर्ष ८५)यांच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ.सौ.अरूणा बडवे या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून संतपिठ, पैठण येथील ज्ञानेश्वरीचे प्रा.डॉ. सुभाष खेत्रे हे होते. तर व्यासपीठावर ज्ञानेश्वरी वाचन वर्गाचे मार्गदर्शक प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी), डॉ.अरविंद मुळे व कार्यक्रमाच्या आयोजीका श्रीमती प्रभावती बोरूळकर हे उपस्थित होते. सुरूवातीला टाळ मृदंगाच्या गजरात दिंडी काढण्यात आली. दिंडीत महिला व पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दिंडीत महिला व पुरूषांनी मोठ्या उत्साहात फुगड्या, पावली खेळली. त्यानंतर श्री पांडुरंग जोशी गुरूजींच्या मंत्रोच्चारात श्री विठ्ठल रूक्माईचे, श्री ज्ञानेश्वर माऊलींचे व श्री ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पुजन करण्यात आले. त्यानंतर व्यासपिठावरील मान्यवरांचा शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार सत्कार करण्यात आला. त्यानंतर सुप्रसिद्ध गायक प्रा.गजानन केचे यांनी "ग्रंथ ज्ञानेश्वरी वाचता भक्तिने..." ही प्रा. ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी) यांची अभंग रचना सुंदर गावून कार्यक्रमाची मंगलमय सुरूवात केली. ज्ञानेश्वरी वाचन उपक्रमाचे प्रवर्तक श्री प्रमोद बेंडे यांनी अध्यक्षा व प्रमुख पाहुण्याचा परिचय करून दिला. वाचकाच्या वतीने सौ.सुनीता पाठक व सौ खोडेगांवकर मावशींनी मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.सुभाष खेत्रे आपले अभ्यासपूर्ण मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, "मुळात मनुष्य जन्म मिळणंच दुर्लभ आहे. आणि मिळाला तर महापुरूषांची संगत मिळणे दुर्लभ आहे आणि संतकृपा होणे हे तर त्याहून दुर्लभ आहे. आपण एवढ्या मोठ्या प्रमाणात ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पारायण केले हे खरोखरच फार कौतुकास्पद आहे." असे म्हणून त्यांनी ज्ञानेश्वरी पारायणाचे महत्त्व सविस्तरपणे विषद केले. प्रा. ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी) यांनी थोडक्यात आपले मनोगत व्यक्त करतांना "आपण सर्वजण माझे मुख्य उर्जा स्त्रोत आहात" असे म्हणत सर्वांचे ऋण व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप करतांना डॉ.अरूणा बडवे म्हणाल्या की,"सारेच संत हे स्वानंद साम्राज्याचे चक्रवर्ती आहेत, ही ज्ञानाची परिसीमा आहे. सारेच संत चैतन्य,कैवल्य, चक्रवर्ती पद सर्वांच्या कल्याणासाठी उधळून देतात." असे सांगून संत जनाबाईंच्या "वाचावी ज्ञानेश्वरी..." या अभंगाची हळुवारपणेउकल करत ज्ञानेश्वरी वाचनाचे महत्व सांगितले. सर्व श्रोते एकाग्रतेने वक्त्याचे विचार श्रवण करत होते. कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन सौ. मंगला चौरे यांनी केले तर श्री पिंगळे यांनी आभारप्रदर्शन केले आणि शेवटी सामुहिक पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमानंतर सर्वांनी महाप्रसादाचा अस्वाद घेतला. संपूर्ण कार्यक्रम पार पडेपर्यंत लाईट नव्हती तरी सर्व रसिक शांतपणे वक्त्यांचे विचार एकाग्रतेने श्रवण करत होते हे विशेष. हीच माऊली विषयी श्रोत्यांची असलेली श्रध्दा आणि माऊलींची श्रोत्रवर असलेली कृपा याची प्रत्यक्ष अनुभूती म्हणजे आजचा हो सोहळा होता असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

# सुनेत्रा पवार यांच्या दौंड तालुका दौऱ्याला सुरुवात

## दौंडमध्ये महायुतीचे नेते एकवटले

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** दौंड दि. २४ एप्रिल - बारामती लोकसभा मतदारसंघाच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस व महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार या आज दौंड तालुक्याच्या दौऱ्यावर आहेत. दौंड तालुक्यातील खडकी येथून सुनेत्रा पवार यांनी आपल्या दौऱ्याला सुरुवात केली. या दौऱ्यात आमदार राहुल कुल, माजी आमदार रमेश थोरात, भाजपचे जिल्हाध्यक्ष वासुदेव काळे, कांचन कुल, वैशाली नागवडे, उत्तमराव आटोळे, नंदू पवार, वीरधवल जगदाळे आदींसह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

सुनेत्रा पवार यांचा उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतर प्रथमच दौंड तालुक्यात संयुक्त दौरा होत आहे. या पार्श्वभूमीवर महायुतीचे सर्वच प्रमुख एकवटले आहेत. आम्ही प्रमुखच आता एकत्रपणाने या निवडणुकीला सामोरे जात आहोत. त्यामुळे दौंड तालुक्यातून मोठ्या प्रमाणात मताधिक्य मिळेल असा विश्वास माजी आमदार रमेश थोरात यांनी व्यक्त केला. तर महायुतीत आम्ही सर्वांनी एकत्रित पुढे जाण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता स्थानिक पातळीवरही कार्यकर्त्यांनी सामंजस्याची भुमिका घेवून सुनेत्रा पवार यांना अधिकाधिक मतदान होईल यासाठी प्रयत्नशील रहावे असे आवाहन आमदार राहुल कुल यांनी यावेळी केले. देशाचे भवितव्य ठरवणारी ही निवडणुक आहे. विकासाला महत्व देणाऱ्यांच्या पाठिशी उभे राहण्याची भूमिका आपण घेतली पाहिजे असे आवाहन सुनेत्रा पवार यांनी यावेळी केले. महायुतीची वज्रमूठ दिवसेंदिवस घट्ट होत असताना आपणही त्यात सामील होवून विकासरथात सहभागी होवून घड्याळाला अधिकाधिक मतदान करावे असेही सुनेत्रा पवार यांनी नमूद केले. दरम्यान, सुनेत्रा पवार यांचे दौंड तालुक्यातील विविध गावात उत्साहात स्वागत होत आहे.

महायुतीच्या उमेदवार सौ. सुनेत्रावहिनी पवार दौंड तालुका दौऱ्यावर असताना हातवळण गावात गेल्या असता तेथील स्थानिक शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी समजून घेतल्या व त्यांच्या अडचणी लवकरात लवकर सोडवल्या जातील असा विश्वास दिला. तसेच महायुतीच्या उमेदवाराला प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन केले. यावेळी महायुतीचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.






# खरीप हंगामाचे योग्य नियोजन करा

## जिल्हास्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** खरीप हंगामाला आता सुरवात होणार आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा अतिशय महत्वाचा हंगाम आहे. जिल्ह्यात खते, बियाणे, कृषी निविष्ठा आदींची कमतरता जाणवणार नाही, याबाबत दक्षता घेऊन खरीप हंगामाचे योग्य नियोजन करावे, अशा सुचना जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी कृषी विभागाला दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात कृषी विभागाच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय खरीप हंगाम पूर्व आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार, आत्माच्या प्रकल्प संचालक प्रिती हिरुळकर, कृषी उपसंचालक चंद्रकांत ठाकरे, महावितरणच्या अधिक्षक अभियंता संध्या चिवंडे, कृषी विकास अधिकारी विरेंद्र राजपूत, नाबार्डचे व्यवस्थापक तृणाल फुलझेले, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक प्रशांत धोंगळे यांच्यासह तालुका कृषी अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यात बोगस बियाणांची वाहतूक व विक्री होणार नाही, याबाबत पोलिस विभागाच्या सहकार्याने मोहीम राबवावी, असे सांगून जिल्हाधिकारी गौडा म्हणाले, कृषी यंत्रणांनी पावसाळ्याला सुरवात होण्यापूर्वीच सुक्ष्म नियोजन करावे. जिल्ह्यात खते, बियाणे मुबलक प्रमाणात उपलब्ध झाले पाहिजे, यादृष्टीने आतापासूनच कार्यवाही करावी. खरीप विमा मंडळनिहाय काढणे गरजेचे आहे. जेवढे खरीपाचे क्षेत्र आहे, त्यापेक्षा जास्त क्षेत्राचा विम्यामध्ये समावेश असू नये. यासाठी तालुका कृषी अधिका-यांनी फिल्डवर जावे. तसेच ई-केवायसी बाबत विशेष मोहीम राबवावी. तृणधान्याला चांगली मागणी व भाव असून जिल्ह्यात तृणधान्याचे उत्पादन वाढीसाठी प्रयत्न करावेत. कृषी विषयक माहिती शेतक-यांना बांधावर मिळण्यासाठी प्रात्यक्षिकांची संख्या वाढवावी, अशा सुचना जिल्हाधिका-यांनी दिल्या.

**जिल्ह्यात रब्बी क्षेत्रात वाढ :** सादरीकरण करतांना जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी श्री. तोटावार म्हणाले, जिल्ह्यात एकूण 5 लक्ष 52 हजार 729 हेक्टर (48.30 टक्के) क्षेत्र लागवडीखाली असून खरीप हंगाम 2024 – 25 मध्ये धानासाठी 1 लक्ष 91 हजार हेक्टर, कापूस 1 लक्ष 80 हजार हेक्टर, सोयाबीन 75 हजार हेक्टर, तूर 36 हजार हेक्टर व इतर पिकासांठी पेरणी क्षेत्र प्रस्तावित करण्यात आले आहे. जिल्ह्यात रब्बी हंगामात सरासरी पेरणी क्षेत्र 88245 हेक्टर असून प्रत्यक्षात 1 लक्ष 20 हजार 84 हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. ही पेरणी सरासरीच्या 136 टक्के आहे.

**जिल्ह्यात खतांची उपलब्धता :** जिल्ह्यासाठी युरीया, डीएपी, एमओपी, एसएसपी, संयुक्त खते आणि मिश्र खते असे एकूण 1 लक्ष 56 हजार 300 मेट्रीक टन खते कृषी आयुक्तालयाकडून मंजूर झाले आहे. 24 एप्रिल 2024 अखेर जिल्ह्यात 89329 मेट्रीक टन साठा शिल्लक आहे.

# खुलताबाद तालुक्यातील तिन्ही मंडळे दुष्काळसदृश यादीत, सुविधांचा विसर

आधुनिक केसरी न्यूज


**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी, सुलतानपूर, वेरुळ तिन्ही महसूल मंडळे दुष्काळ सदृश्य यादीत असताना सवलत सुविधा चा मात्र दुष्काळ असल्याचे चित्र आहे.

गत वर्षी २०२३ मधे पावसाळ्यात वर्ष -२०२२ च्या तुलनेत अर्धाही पाऊस म्हणजे ५०% टक्केही पर्जन्यमान झाले नव्हते. व त्यामुळे नदी नाले ओढे विहिरी तलाव कोरडे पडून होते. तर तुरळक पावसामुळे वर्ष -२०२३ मधे खरिप पिक व रब्बी पिक हंगाम वाया गेले होते.प्रशासनाने नजर पाहणी व आणेवारी पाहणीत दुष्काळ सदृश्य परिस्थिती आढळून आल्याने शासन-प्रशासनाने खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी सुलतानपूर वेरुळ तिन्ही महसूल मंडळ दुष्काळ सदृश्य यादीत घेतले खरे. त्यामुळे शेतकऱ्यांतून आनंद व्यक्त करण्यात आले होते. कारण दुष्काळसदृष्य परिस्थीती मुळे शासनाकडून विविध सवलत सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात.यात दुष्काळ जाहीर झाल्यानंतर अधूनमधून अवकाळीने लावून धरल्याने शासन प्रशासन तथा शेतकरी त्यात लागला व दुष्काळाचा विसर पडला.विविध सवलती सुविधा ही शेतकऱ्यांना मिळाल्या नाही. की मजुरांना रोजगार हमी योजनेचे काम. कोठे काहीच नाही. मजुर काम-काम करत असताना कुणीही त्याला वाली नाही. सर्व बोलायचेच भात बोलायचीच कढी प्रकार सुरु आहे. नावाला दुष्काळ सदृश्य परिस्थिती मात्र प्रत्यक्षांत शासन प्रशासन लोकप्रतिनिधी मस्त सर्व सामान्याचे हाल असी स्थीती आहे.हाताला काम नाही, खिशात पैसा नाही,चारा नाही,पाणी नाही,व्यवसाय व्यवहार नाही,मदत नाही. बरोबर अशात शेतकरी शेतमजूर नागरिकांनी काय करावे.असा प्रश्न त्यांना पडला आहे. वरिष्ठांनी यांत जातीने लक्ष घालून शासन प्रशासनाने लोकप्रतिनिधींनी शेतकरी शेतमजूर यांना आर्थिक मदत करावी अशी मागणी शेतकरी नागरिकांतून होत आहे.

# ज्येष्ठ पत्रकार स. म. कुलकर्णी यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** कोपरगाव तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष व जेष्ठ पत्रकार सदाशिव महिपती उर्फ स.म. कुलकर्णी (वय-९०) यांचे आज पहाटे ०५ वाजेच्या सुमारास दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, भाऊ, बहिणी असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर आज सायंकाळी ०५ वाजता कोपरगाव अमरधाम येथे अंत्यविधी होणार असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. ते सतीष कुलकर्णी यांचे पिताश्री होत. स्व. स.म. कुलकर्णी हे अत्यंत अभ्यासू व्यक्तिमत्व होते. त्यांचा जलसंपदा,महसूल आदी विषयात गाढा अभ्यास व मोठा जनसंपर्क होता. स्वाभिमानी पत्रकारितेचा व पत्रकारीतेच्या सुवर्णयुगाचे ते अखेरचे साक्षिदार होते असे म्हटलं तर वावगे ठरू नये.खंडकरी शेतकऱ्यांच्या प्रश्नाचा व आकारी पडीत शेतकऱ्यांच्या त्यांचा मोठा अभ्यास होता.त्यांच्या काळात आमदार व खासदार आपल्या बातम्या वर्तमानपत्रात छापून याव्या म्हणून या पत्रकारांचे उंबरे झिजवत होते त्याचे ते साक्षिदार होते.त्यांच्यासह शं.पा.कपिले, टि.बी.मंडलिक आदी मंडळी हि तालुका पत्रकार संघाची संस्थापक होती.मात्र ते मंडलिक यांच्या नंतर तयहयात पत्रकार संघाचे अध्यक्ष होते. त्यांनीच आपल्या काळात स्व शंकरराव कोल्हे हे महसूल मंत्री असताना वसंतदादा पाटील यांचे काळात पत्रकार संघास मोठा निधी उपलब्ध केला होता.त्यातून त्यांनी 'माहुर' हि इंदिरा पथ मार्गावर असलेली इमारत विकत घेतली होती .हा पत्रकार संघ वाढावा व सुरक्षित हातात रहावा, त्यातून पत्रकारांच्या हिताचे कार्यक्रम व्हावे, अशी त्यांची शेवटची इच्छा होती.



त्यांचे वडील महिपती कुलकर्णी हे संत साईबाबा यांच्या काळातील साक्षिदार व तत्कालीन पाटबंधारे विभागातील मोजणीदार होते.त्यातून त्यांना जलसंपदा विभागाच्या विषयाची आवड निर्माण झाली होती. त्यांनी लोकसत्ता, इंडियन एक्सप्रेस,टाइम्स ऑफ इंडिया आदी वर्तमान पत्रात सुमारे पाच साडेपाच दशक काम केले होते.आजही विविध शासकीय विभागातील बड्या अधिकाऱ्यांशी त्यांचा संपर्क टिकून होता. मात्र काही दिवसापूर्वी घरात त्यांचा चक्कर येऊन खुब्यास मोठी गंभीर इजा पोहचली होती. त्यातून त्यांना त्यांच्या मुलांनी आधी डॉ.जपे हॉस्पिटल व नंतर नाशिक येथील रुग्णालयात उपचारार्थ भरती केले होते.

# घराघरांत ग्रंथालय उभारणे हेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना खरे अभिवादन : सुनील वारे

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ज्ञानाचे प्रतिक असुन त्यांनी लिहिलेल्या “द प्रॉब्लेम ऑफ रुपी” या पुस्तकावरच देशाचे व जगाच्या अर्थकारणाला दिशा मिळाली असुन प्रत्येक व्यक्तीच्या घराघरात पुस्तके, ग्रंथालय असले पाहिजेत.ग्रंथालय हे प्रेरणा व जीवनाला दिशा देतात.त्यामुळे आपण आपल्या उद्दिष्टांपर्यंत पोहोचतो.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ ही विचारांची,पुस्तकांची,आपल्या प्रगतीची चळवळ असुन घराघरात ग्रंथालय उभारणे. हेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना खरे अभिवादन असल्याचे प्रतिपादन बार्टी संस्थेचे महासंचालक सुनिल वारे यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे संस्थेच्या वतीने २३ एप्रिल २०२४ रोजी जागतिक पुस्तक दिनानिमित्त बार्टी ग्रंथालयाच्या वतीने बार्टी सभागृहात वाचण प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस महासंचालक सुनिल वारे यांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार,विभागप्रमुख वृषाली शिंदे,अनिल कारंडे यांनीही अभिवादन केले. सुनिल वारे यांच्या हस्ते बार्टीतील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना जागतिक पुस्तक दिनानिमित्त “द प्रॉब्लेम ऑफ रुपी” हा ग्रंथ भेट देण्यात आला.विभागप्रमुख श्रीमती वृषाली शिंदे यांनी जागतिक पुस्तक दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. दुसऱ्या सत्रात विस्तार व सेवा आयबीपीएस विभागाचे विभाग प्रमुख डॉ.सत्येंद्रनाथ चव्हाण यांनी वाचन प्रेरणा दिनानिमित्त मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर हीच आमची प्रेरणा



ऊर्जा असून याच महामानवाने या देशातील महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी हिंदु कोड बिल मांडले तसेच या देशाचे संविधान लिहुन उपेक्षित,वंचित,शोषित,पिडीतांना न्याय दिला असल्याचे सांगून ग्रंथपाल वैशाली खांडेकर यांचे तसेच प्रकाशन व प्रसिद्धी, समतादुत विभागातील टिमचे अभिनंदन केले.बार्टीतील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वाचन प्रेरणा दिनानिमित्त पुस्तकाचे वाचन करून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.प्रास्ताविक सुत्रसंचलन ग्रंथपाल वैशाली खांडेकर यांनी केले. आभार रामदास लोखंडे यांनी मानले.

# 'त्या' अपघाताची अद्याप पोलीस स्टेशनमध्ये नोंदच नाही

आधुनिक केसरी न्यूज

> जर एक महिला तालुका हद्दीत मयत झाली . तिच्या मृत्युच्या बातम्या झळकल्या . पण नक्की काय झाले याची खबर पोलीस निरिक्षक यांनाच नसेल मग माझा ग्रामीण भाग खरच सुरक्षीत आहे का ? हा मोठा प्रश्न पडला आहे . माझ्या देशातील ग्रामीण भागातील जनता आडाणी व शोषीत आहे . आंदोलनाची लवकरच कळवली जाईल . **संजय काळे, सामाजिक कार्यकर्ते कोपरगाव .**
>
> या अपघाताबाबत शिर्डी पोलीस स्टेशन कडून अजून आमच्याकडे गुन्हा वर्ग झालेला नाही याबाबत माहिती घेऊन योग्य ती कार्यवाही केली जाईल . **संदीप कोळी, पोलीस निरीक्षक कोपरगाव तालुका पोलीस स्टेशन**

**कोपरगाव :** तालुक्यातील चांदेकसारे हद्दीतील साई मुकुंद हॉटेलजवळ पाथरे येथील साईबाबांचे पालखीमध्ये राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६० सिन्नर ते शिर्डी येथे एका भरधाव येणाऱ्या दुचाकी स्वाराने केलेल्या अपघातात एक महिला भक्त ठार झाली व दोन जबर जखमी झाल्याची घटना मागील आठवड्यात घडली. मात्र सदर अपघाताचा गुन्हा कोपरगाव तालुका पोलीस स्टेशनमध्ये अद्याप दाखल झालेला नसल्यामुळे आश्चर्य व्यक्त होत आहे.

हा अपघात मंगळवार दिनांक १६ एप्रील ला घडला होता त्यामध्ये मयत भक्ताचा पंचनामा झाला व शवविच्छेदन राहाता येथील शासकीय रूग्णालयात झाले मात्र अपघात घडलेली जागा ही कोपरगाव ग्रामीण पोलीस ठाणेच्या हद्दीत येते.

त्यामुळे याच पोलीस स्टेशनमध्ये हा गुन्हा दाखल होऊन त्याचा तपास होणे क्रमप्राप्त होते.

याप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते संजय काळे तालुका पोलीस ठाण्यात लेखी तक्रार घेऊन ह्या अपघाताला जबाबदार असलेले राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण चे प्रकल्प संचालक नाशिक यांचेवर प्रकल्प अर्धवट ठेवला म्हणून सदोष मनुष्य गुन्हा दाखल करावा अशी मागणी करणारी फिर्याद देण्यासाठी गेले असता तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक यांनी तक्रार घेण्यास नकार दिला असल्याचे संजय काळे म्हणाले व असा कुठलाही गुन्हा कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात दाखल नाही तसेच पोलीस स्टेशनला लेखी तक्रार घेण्याची पध्दत नाही असे सांगण्यात आल्यामुळे काळे यांनी पोलीस अधीक्षक यांना पत्राद्वारे गुन्हा दाखल करून घेण्याबाबत मागणी केली आहे.

पोलीस अधीक्षकांना दिलेल्या पत्रात काळे म्हणाले की, जर माझ्या सारख्या कायद्याचे त्रोटक ज्ञान असलेल्या माणसाला हे उत्तर पोलीस स्टेशन मध्ये मिळत असेल तर माझ्या ग्रामीण भागातील जनतेला हे वाटाण्याच्याच अक्षदा लावत असतील.

नागरिकांनी जर लेखी तक्रार दिली तर राज्यातील देशातील कोणत्याही पोलीस स्टेशनने ती तक्रार स्विकारलीच पाहीजे व संबंधिताला त्याची पोहच दिलीच पाहिजे ह्या मागणीसाठी उपविभागीय पोलीस अधिकारी शिर्डी यांचे कडे पायी जाऊन निवेदन देणार आहे असे आपल्या पत्रात म्हटले आहे.

# प्रचार साहित्यावर मुद्रक व प्रकाशकांचे नाव छापणे बंधनकारक : बाळासाहेब कोळेकर

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** शिर्डी लोकसभा मतदारसंघात सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. या निवडणूक आदर्श आचारसंहिता काळात संबंधित मुद्रक प्रिंटर्सनी प्रचार साहित्य तसेच इतर छपाई बाबत विशेष काळजी घेऊन आचारसंहितेचे पालन करावे. प्रचार साहित्यावर मुद्रक व प्रकाशकांचे नाव छापणे बंधनकारक असल्याचे आवाहन अपर जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी केले आहे.

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ च्या 'कलम १२७ अ' द्वारे निवडणूक पत्रकांच्या छपाईवर आणि प्रसिद्धीवर निर्बंध घालण्यात आले आहेत. याकडे सर्व राजकीय पक्ष, निवडणूक लढविणारे उमेदवार आणि मुद्रणालयांच्या चालक व मालकांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

हाताने नक्कल काढण्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रक्रियेने छापण्यात किंवा अनेक प्रती काढण्यात आलेले निवडणुकीसंबंधीचे प्रत्येक पत्र, हस्तपत्रक, घोषणाफलक किंवा भित्तीपत्रक यांच्या दर्शनी भागावर मुद्रकांचे आणि प्रकाशकाचे नाव व पत्ता प्रसिध्द करणे बंधनकारक आहे.

कोणत्याही व्यक्तीला निवडणूक पत्रिका, भित्तीपत्रके, होल्डींग्स, फ्लेक्स बोर्ड तो स्वतःच त्याचा प्रकाशक आहे. याबद्दल स्वतः स्वाक्षरित केलेले आणि ज्या व्यक्ती तिला व्यक्तिशः ओळखतात अशा दोन व्यक्तीनी साक्षांकित केलेले अधिकथन त्याने मुद्रकाला दोन प्रतीमध्ये दयावेत.

दस्तऐवज मुद्रित झाल्यानंतर वाजवी मुदतीच्या आत, मुद्रक व प्रकाशकाने त्या दस्ताएवजाची एका प्रतीसह प्रकाशकाच्या अधिकथनाची एक प्रत राज्याच्या राजधानीच्या ठिकाणी मुद्रित झाला असेल तर, मुख्य निर्वाचन अधिकाऱ्याला किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी मुद्रीत झाली असेल तर त्या जिल्ह्याच्या जिल्हा दंडाधिकाऱ्याला पाठविल्याशिवाय मुद्रीत करता येणार नाही किंवा मुद्रीत करवता येणार नाही.

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ च्या कलम १२७ अ' मधील तरतूदीं भंग केल्यास मुद्रक किंवा प्रकाशकास सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा दोन हजार रुपयापर्यत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा व दोन्ही शिक्षा होऊ शकते.

कोणतीही व्यक्ती मुद्रक किंवा प्रकाशक यांना धर्म, पंथ, जात, समाज किंवा भाषा यामध्ये तेढ निर्माण करणारे अथवा विरोधकाचे चारित्र्यहरण करणारे निवडणूक विषयक मजकूर व साहित्य प्रकाशित करता येणार नाही.

भारत निवडणूक आयोग यांचेकडील सूचना तसेच लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ च्या कलम १२७ अ' मधील तरतूदीनुसार मुद्रक व प्रकाशक यांना जोडपत्र क व जोडपत्र ख मध्ये लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चे अनुषंगाने छपाई साहित्याची माहिती देणे बंधनकारक आहे.असे अपर जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी कोळेकर यांनी कळविले आहे.



# सुरेशनगर येथे हनुमान जन्मोत्सव सोहळ्याची काल्याची दहीहंडी फोडून सांगता

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** तालुक्यातील आदर्शगाव सुरेशनगर येथील ग्रामदैवत श्री हनुमंतरायांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने आयोजित त्रिदिनात्मक सोहळयाची काल्याची दहीहंडी फोडून सांगता करण्यात आली.धार्मिक कार्यक्रमाच्या माध्यमातून धर्माचे वैभव वाढवा,त्यासाठी धर्म कार्य करीता सर्वांनी मिळून तन मन धनाने योगदान द्यावे असे आवाहन स्वयंभू त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत स्वामी श्री रमेशानंदगिरीजी महाराज यांनी यावेळी बोलताना केले. सुरेशनगर येथील हनुमान मंदिर प्रांगणात रात्री झालेल्या काल्याच्या किर्तन प्रसंगी बोलतांना स्वामी रमेशानंदगिरीजी महाराज म्हणाले की गावचा अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने सर्व समाज एकत्रित येतो,सर्वांनी दिलेल्या योगदानामुळे गावचे ऐक्य वाढीस लागते, धार्मिक कार्यक्रमाच्या माध्यमातूनच धर्माचे वैभव वाढत असल्याने अशा कार्यक्रमामध्ये सर्वांनी आपापले मतभेद बाजूला ठेऊन योगदान दिल्यास गावचा एकोपा ही वाढीस लागेल असे सांगून त्यांनी भगवान श्रीकृष्ण परमात्म्याच्या बाललीलांचे वर्णन त्यांनी यावेळी बोलताना केले.

हनुमान जयंतीच्या निमित्ताने ग्रामदैवत हनुमान मूर्तीचे विधीवत पूजन महंत स्वामी रमेशानंदगिरीजी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले.सरपंच कल्याणराव उभेदळ यांनी आलेल्या संत मंडळी व ग्रामस्थांचे स्वागत केले उपसरपंच नाथाभाऊ बाबर यांच्या हस्ते रमेशानंदगिरीजी महाराज यांचे संतपूजन करण्यात आले. सोहळा समितीचे विठ्ठलराव पाषाण यांनी प्रास्ताविक केले सोहळयासाठी योगदान देणाऱ्या दात्यांचा यावेळी सोहळा कमिटीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

झालेल्या त्रिदिनात्मक सोहळयाच्या सांगता प्रसंगी हभप लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे,पारायण व्यासपीठ प्रमुख नितीन महाराज हारकळ, हभप विष्णूदास महाराज सांगळे यांच्यासह सोहळा कमिटीचे सदस्य,तरुण मंडळाचे पदाधिकारी,महिला भगिनीसह पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हनुमान जयंती निमित्ताने महाआरती झाल्यानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.सोहळा समितीचे मार्गदर्शक सरपंच कल्याणराव उभेदळ यांनी सर्व भाविक व ग्रामस्थांचे आभार मानले.



# जि.प. शाळेतील चौथीच्या विद्यार्थ्यांना निरोप

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** शहरालगत असलेल्या भिस्तबाग जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. तर गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करुन वेदांत विकास वजन व जय नागनाथ काजळकर यांना स्टुडंट्स ऑफ द इयर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अद्यावत व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या या जिल्हा परिषद शाळेचे भौतिक सुविधांनी रुप पालटले असताना परिसरातील विद्यार्थ्यांचा ओढा शाळेकडे वाढला आहे. इयत्ता पहिलीसाठी प्रवेश घेतलेल्या नवोदित विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. गुणवंत व स्टुडंट्स ऑफ द इयर पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांना शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता काळे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी सहशिक्षिका सुरेखा वाघ, शितल आवारे, योगिता वाघमारे, अहिल्या सांगळे आदींसह विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे स्वागत करुन शाळेबद्दल मनोगत व्यक्त केले. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी इतर शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. तर शाळेसाठी छत्रपती संभाजी महाराजांची प्रतिमा भेट दिली.

अनिता काळे म्हणाल्या की, मुलांना शाळेतून जीवनावश्यक शिक्षण मिळणे सर्वात महत्त्वाचे आहे. नवीन शैक्षणिक धोरणातून भारताचा सक्षम नागरिक घडणार आहे. शिक्षणाबरोबरच मुलांना संस्कार व महापुरुषांचे विचार रुजवणे आवश्यक आहे. त्याच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी शिक्षक झटत असतात, शिक्षणाबरोबर कौशल्य निर्माण करण्याचा शिक्षकांचा प्रयत्न आहे. उत्कृष्ट शिक्षक व त्यांना साथ देणारे पालक शिक्षण क्षेत्रात क्रांती घडवून आणू शकतात. नेतृत्व संपन्न विद्यार्थी हि राष्ट्राची संपत्ती आहे. ज्ञानसागरातील राजहंस निर्माण करुन सक्षम पिढी घडविण्याचे कार्य जिल्हा परिषद शाळेच्या माध्यमातून सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन जय काजळकर व वेदांत वजन यांनी केले.

# शासकीय निधीच्या भ्रष्टाचाराचा तपास भ्रष्टाचार विरोधी पथकाकडे सोपवा : संजय काळे

आधुनिक केसरी न्यूज

**किसन पवार**

**कोपरगाव :** येथील तहसील कार्यालयातील निवडणूक विभागात कार्यरत असलेला महसूल सहाय्यक राहुल साहेबराव शिरसाठ याने मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचे वितरित करण्यात येणारे मानधन परस्पर आपले कुटुंबातील व जवळचे नातेवाईक यांचे नावे दाखवून हडप केले असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्यानंतर कोपरगाव तालुक्यात खळबळ उडाली या प्रकरणी कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात राहुल साहेबराव शिरसाठ याचेवर फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे दरम्यान शिरसाठ याने अटकपूर्व जामिनासाठी केलेला अर्ज न्यायालयाने फेटाळला आहे.

दि.१८/३/२०२४ रोजी माहिती अधिकार कार्यकर्ते संजय काळे यांनी कोपरगाव चे तहसीलदार संदीपकुमार भोसले यांचे स्वाक्षरीने महाराष्ट्र शासनाचा प्राप्त निधी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचे पर्यवेक्षक नसलेल्या व्यक्तींच्या नावे रूपये ६ लाख वर्ग करून भ्रष्टाचार, अफरातफर व अनियमितता झाल्याची तक्रार दाखल केली.

दरम्यान जिल्हाधिकारी यांचेकडे याबाबत तक्रार करून या गोष्टीची सखोल चौकशीची मागणी केली होती त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी शिर्डी उपविभागीय अधिकारी यांना आदेश देऊन चौकशी अहवाल मागवला होता सदर अहवालात राहुल साहेबराव शिरसाठ या महसूल कर्मचाऱ्यावर निलंबनाची शिफारस केलेली आहे. तर तहसीलदार संदीपकुमार भोसले आणि नायब तहसीलदार मनीषा कुलकर्णी यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ चे नियम ३ मधील तरतुदीचा भंग केल्यामुळे त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) १९७९ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्याची शिफारस शिर्डी उपविभागीय अधिकारी यांनी आपल्या अहवालात केली आहे.

अखेर या प्रकरणी शिर्डी येथील उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयातील नायब तहसीलदार विलास बबन राव भांबरे यांनी कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता.

त्यात अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी राहुल शिरसाठ याने जिल्हा सत्र न्यायालयाकडे अर्ज केला होता. मात्र न्यायालयाने हा अर्ज फेटाळला आहे.

दरम्यान याप्रकरणी संजय काळे यांनी पोलीस अधीक्षक राकेश ओला यांना नुकतेच पत्र देऊन शिर्डी उपविभागीय अधिकारी यांच्या अहवालात शिफारस केले प्रमाणे यातील उर्वरित दोन दोषी निवडणूक नायब तहसीलदार मनीषा कुलकर्णी व तहसीलदार संदीप भोसले यांना बेजबाबदार धरले आहे. त्यामुळे या अधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा, शासकीय निधीचा पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करून, कट कारस्थान करून, खोटे दस्तऐवज करून भ्रष्टाचार केल्याचा आरोप केला आहे.

त्यामुळे या प्रकरणी भादवि ३५, १९४ व १९५ देखील लागू होत असून प्रथमदर्शनी तीनही व्यक्तींनी भ्रष्टाचार केल्याचे सिद्ध होत असून पुढील तपास व कारवाईसाठी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा कलम १३ प्रमाणे सदर गुन्ह्याचा तपास भ्रष्टाचार विरोधी पथकाकडे वर्ग होणे आवश्यक आहे व सेवा काळातील त्यांनी केलेल्या भ्रष्टाचाराची व संपत्तीची देखील सखोल चौकशी व्हावी अशी ही मागणी आपल्या पत्रात काळे यांनी केली आहे.

त्यामुळे आता या प्रकरणी प्रशासन काय भूमिका घेते याकडे नागरिकांच्या नजरा लागल्या आहे.

# साहित्यिक वसंत केशव पाटील यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** सांगलीतील ज्येष्ठ साहित्यिक वसंत केशव पाटील (वय ७९) यांचे बुधवारी निधन झाले. पाटील यांना डॉ. हरिवंशराय बच्चन यांच्या दशद्वार ते सोपान या आत्मचरित्राच्या अनुवादासाठी १९९६ मध्ये साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला होता. वसंत केशव पाटील यांचे मूळ गाव कुमठे (ता. तासगाव, जि. सांगली) आहे. रयत शिक्षण संस्थेतून शिक्षक म्हणून सेवा सुरू केली आणि हिंदी विषयाचे प्राध्यापक म्हणून निवृत्त झाले. ग्रामीण मराठी व हिंदी साहित्यात त्यांनी मोठे योगदान दिले. यशवंतराव: विचार आणि वारसा, छप्पर, आधुनिक शिक्षा शिल्पी : कर्मवीर भाऊराव पाटील, कंदिलाचा उजेड, सहीमागाचा माणूस असे त्यांनी कादंबरी, कथा, अनुवाद व कविता यामध्ये विपुल लेखन केले.